www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 229 वा शनिवार दि. 03 माई २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

खासदार सुनील तटकरे आज मोहोपाड्यात भूमिपूजन सोहळ्याचे उद्घाटन खासदार तटकरे यांच्या हस्ते

दैनिक युवक आधार
रसायनी (आनंद पवार)

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा हद्दी मध्ये सोलर पथदिवे व हायमॅक्स बसविण्याचा कामाचा भूमिपूजन सोहळयाचे उद्घाटन कोकणचे भाग्यविधाते रायगडचे खासदार तथा पेट्रोलियम व नैसर्गिक वायु समिती,भारत सरकारचे अध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते संपन्न होणार असुन कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून उरणचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी हे उपस्थित राहणार आहेत. शनिवार दि.३ मे रोजी सकाळी १०वाजता ग्रुप ग्रामपंचायत वासांबे कार्यालयात संपन्न होणाऱ्या कार्यक्रमा प्रसंगी दिव्यांगांसाठी घरघंटी वाटप,वासांबे ग्रामपंचायत हद्दीत पिशवी वाटप,तसेच वासांबे ग्रामपंचायतच्या माजी सरपंचांचा जाहीर सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.तरी या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामपंचायतीच्या सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा सौ.उमा संदीप मुंढे व उपसरपंच भूषण लक्ष्मण पारंगे व सर्व सन्माननीय सदस्यांनी केला आहे.

लईराई देवीच्या जत्रोत्सवात चेंगराचेंगरी

६ भाविकांचा मृत्यू, ४० जण जखमी, उत्सवाला गालबोट

गोव्यातील शिरगावात लईराई देवीच्या प्रसिद्ध जत्रोत्सवास सुरुवात झाली. देवी लईराईच्या जत्रोत्सवासाठी राज्याच्या विविध भागातून धोंड आणि भाविक दर्शनासाठी दाखल झाले. सिंधुदुर्ग आणि अन्य सीमावर्ती भागातूनही भाविक या जत्रोत्सवासाठी दाखल झाले होते. लईराई देवीचा जत्रोत्सवाला हजारो भाविक हजेरी लावतात. परंतु, या जत्रोत्सवात चेंगराचेंगरी झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या चेंगराचेंगरीत ६ भाविकांचा मृत्यू झाला असून, सुमारे ३० ते ४० जण जखमी झाल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. जखमी भाविकांना डिचोली आरोग्य केंद्र, म्हापसा जिल्हा रुग्णालय आणि गोमेकॉत उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृतांमध्ये २ महिला, २ पुरुष आणि एका १७ वर्षीय युवकाचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. २० जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजत आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी सध्या बचाव कार्य सुरू आहे. तर दुसरीकडे, लईराई मंदिरात संशयास्पद हालचालींप्रकरणी २३ संशयितांना ताब्यात घेतले आहे. भाविकांच्या सुरक्षेसाठी

पोलिसांनी ड्रोन आणि साध्या वेशातील अधिकारी तैनात केले आहेत.

यात्रेच्या पहिल्याच दिवशी या उत्सवाला गालबोट लागले

शुक्रवार, ०२ मे २०२५ पासून शिरगाव येथे लईराई देवीच्या प्रसिद्ध जत्रोत्सवाला गोव्यासह शेजारील महाराष्ट्र आणि कर्नाटकातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या जत्रेला मोठ्या प्रमाणावर भाविक गर्दी करत असतात. दरम्यान, यात्रेच्या पहिल्याच दिवशी या उत्सवाला गालबोट लागले आहे. आमदार चंद्रकांत शेट्ये, पेमेंद्र शेट आणि जिल्हाधिकारी स्नेहा गीते यांनी रुग्णालयात जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि जखमींची भेट घेण्यासाठी उत्तर गोवा जिल्हा रुग्णालयाला भेट दिली. शिरगाव येथील लैराई जत्रा येथे झालेल्या दुःखद चेंगराचेंगरीमुळे खूप दुःख झाले. जखमींना भेटण्यासाठी रुग्णालयात गेलो आणि पीडित कुटुंबांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत याची खात्री करण्यासाठी मी स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे, असे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी म्हटले आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माझ्याशी संवाद साधून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला आणि या कठीण काळात पूर्ण पाठिंबा दिला, असेही मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले. दरम्यान, या जत्रोत्सवात जखमी झालेल्यांपैकी ८ जणांची प्रकृती अधिक चिंताजनक असून, त्यांना गोवा वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) येथे पाठवण्यात आले. आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांनी सांगितले की, अतिरिक्त डॉक्टर तैनात करण्यात आले आहेत. आरोग्यमंत्र्यांनी आश्वासन दिले की, सर्व आवश्यक व्यवस्था करण्यात आल्या आहेत. प्रत्येक रुग्णाच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी जीएमसी आणि असिलो रुग्णालयातील नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शारदा मंदिर संस्थेच्या प्रांगणात ६६ वा महाराष्ट्र दिन कार्यक्रम संपन्न

दै युवक आधार
दैनिक युवक आधार
कल्याण । रशीद शेख

कल्याण शहरातील शारदा मंदिर संस्थेच्या लालचौकी येथील प्रांगणामध्ये काल महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. ६६ वा महाराष्ट्र दिन स्थापना दिवस यावेळी साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहण प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दत्तात्रय पटवर्धन सर यांच्या हस्ते झाले. यावेळी शारदा मंदिर संस्थेचे कार्यकारणी सदस्य रमेश मोरे सर, अरुण महाजन हे उपस्थित होते. यावेळी ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत ,राज्यगीत , झेंडा गीत यावेळी सादर करण्यात आले. यावेळी विद्यार्थी वर्ग सुद्धा उपस्थित होता. अनेक पालक सुद्धा यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेचा निकाल असल्यामुळे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शारदा मंदिर संस्थेचे कार्यकारणी सदस्य अरुण महाजन यांना १ मे च्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी रमेश मोरे सर यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व व त्यामागील इतिहास सुद्धा आपल्या भाषणातून सांगितला, तसेच यावेळी शारदा म्हणजे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख यांनीही सर्वांना मार्गदर्शन केले. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दत्तात्रय पटवर्धन सर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संदीप भोईर यांनी केले तर प्रास्ताविक अपर्णा हर्ष मॅडम यांनी केले. यावेळी शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेच्या पर्यवेक्षिका सुरेखा पाटील याही उपस्थित होत्या. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या माध्यमातून महाराष्ट्र दिनाचा हा कार्यक्रम संपन्न झाला.

मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भटके विमुक्त आघाडीच्या वतीने आभार

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर

भारताचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी जी यांनी संपूर्ण भारतभर जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला आणि या निर्णयामुळे उपेक्षित वंचित गरीब घटकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे कारण १९३१ नंतर पहिल्यांदाच जातनिहाय जनगणना होत आहे या निर्णयामुळे अंत्योदयाचे स्वप्न पूर्ण होईल असे भाजपा भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी म्हटले आहे . काँग्रेस सरकारने त्यांच्या काळात फक्त आश्वासन दिली परंतु ती कधीही पूर्ण केली नाहीत 2010 साली लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी संसदेमध्ये जातनिहाय जनगणनेचा विषय मांडला होता 2011 साली तेव्हाच्या मनमोहन सिंग सरकारने घोषणाही केली परंतु प्रत्यक्षात जनगणना झालीच नाही त्यामुळे सर्व ओबीसी भटके विमुक्त व दलित आदिवासी यांची मागणी होती की जातनिहाय जनगणना झाली पाहिजे आणि ही मागणी कर्तबगार पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी जी यांनी मंजूर केली त्याबद्दल समस्त ओबीसी भटके विमुक्त व सर्व समाजामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे . ही घोषणा झाल्यानंतर भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रत्येक मंडळामध्ये एकमेकांना पेढे भरून व फटाके वाजवून मोदीजींच्या निर्णयाचे स्वागत केले आहे श्री बबन बारगजे यांनी काही दिवसापूर्वी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांना निवेदन दिले होते की जातनिहाय जनगणना झाली पाहिजे आणि तो निर्णय झाला व त्यामुळे बबन बारगजे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे आभार मानले आहेत .

रोजगार हमी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमधे लाभार्थ्यांची लूट : अ.भा.छावा संघटना व क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा आरोप

दैनिक युवक आधार
वाशीम जिल्हा प्रतिनिधी । लकरण धोंगडे

सिंदखेडराजा :(दि २९ एप्रिल) सिंदखेडराजा पंचायत समितीमधील अधिकाऱ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व रोजगार हमी योजनेतील विहीर मंजुरीसाठी आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटना व अखिल भारतीय छावा संघटना यांनी संयुक्तिक केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशीची मागणी देखील सिंदखेड राजा पंचायत समिती नीता महाजन सहाय्यक गटविकास अधिकारी यांच्या मार्फत निवेदनाद्वारे केली आहे.सिंदखेडराजा तालुक्यातील पुण्यश्लो' अहिल्यादेवी होळकर विहीर व रोजगार हमी योजने अंर्तगत विहीर मंजुरीसाठी सि.राजा प.स तांत्रीक सहायक व रोजगार सेवक यांच्याद्वारे लाभार्थ्यांना संपर्क साधून अनाधिकृत आर्थिक देवाण घेवाण व्यवहार करत असल्याचे जनतेत चर्चा जोर धरत असल्याने,त्याची दखल म्हणून छावा आणि क्रांतिकारी शेतकरी संघटनेने समोर येऊन अवैधरित्या चाललेला अनागोंदी कारभार रोखण्यासाठी पाऊले उचलली आहे, त्याची दखल संबंधित विभागाने घ्यावी.अन्यथा जनतेच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन उभारावे लागेल असा इशारा देखील विकास उगले व बाळासाहेब शेळके पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिला आहे.सिंदखेड राजा तालुक्यात विहीर मंजूर,जिओ टॅगिंग, साठी लाभार्थ्यांची पिळवणूक या सर्व प्रकरणी फार मोठा घोळ कर्मचाऱ्याकडून झाला असल्याचा मोठा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे वरील सर्व प्रकरणाची १५ दिवसाच्या आत सखोल चौकशी करा,मंजूर विहिरीत अनियमितता आढळल्यास संबंधीत कर्मचाऱ्यांवर तातडीने निलंबनाची कारवाही करण्यात यावी. अन्यथा दोन्ही संघटनेच्या वतीने जि.प.कार्यालयासमोर अन्नत्याग आदोलन सरू करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.निवेदन देताना क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष विकास उगले व अखिल भारतीय छावा संघटनेचे विधानसभा प्रमुख बाळासाहेब शेळके पाटील यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

रत्नागिरी खेडशी नाका येथे चौघांना मारहाण दोघान विरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक युवक आधार

चिपळूण प्रतिनिधी : रत्नागिरी तालुक्यातील खेडशी नाका येथे बुधवारी 30 एप्रिल 2025 रात्री 8 वाजण्याच्या सुमारास आंबा पेट्या देऊन परतणाऱ्या दोघांना मारहाण करण्यात आली. गाडीच्या ताडपत्री च्या कारणावरून सुमित उर्फ सिद्ध रमेश चव्हाण वर १९ रा मिरकवाडा ईस्त्राईल नदाफ हे जखमी झाले आहेत. सिध्देश प्रकाश रसाळ संदेश मारुती रसाळ दोघेही राहणार मिरकवाडा रत्नागिरी आणि दोन अनोळखी ईसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुमित उर्फ सिध्द चव्हाण व इस्माईल नदाफ हे झोघे पालघर येथे आंबा पेट्या व्यापार्यांना देऊन हात खांब मार्गे रत्नागिरी ला चाले होते. खेडशी नाक्याजवळ असताना आरोपी क्रमांक 1 ते 4 यांनी त्यांच्या गाडीच्या ताडपत्री च्या कारणावरून वाद घातला. यानंतर आरोपी यानी फिर्याद दार व त्याचा मित्र इस्माईल नदाफ यांना काठीने व हाताच्या ठोशानी मारहाण केली व शिवीगाळ केली असे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

मारहाणीत जखमी झालेल्या सुमित उर्फ सिध्द चव्हाण व इस्माईल नदाफ याच्या वर उपचार सुरू आहेत. पोलीसांनी या घटनेची नोंद घेतली असून आरोपी सिध्देश रसाळ व संदेश रसाळ सह इतर दोन आरोपीचा शोध घेत आहेत.

महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि ऐतिहासिक वारशाने परिपूर्ण- लोकनेते रामशेठ ठाकूर

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

आपल्या महाराष्ट्राची संस्कृती ही समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि ऐतिहासिक वारशाने परिपूर्ण आहे. यामध्ये परंपरा, कला, संगीत, नृत्य, शिक्षण, सण-उत्सव, खाद्यसंस्कृती, वेशभूषा, साहित्य आणि भाषेचा सुंदर संगम आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रात महाराष्ट्राचे कर्तृत्व मोठे आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खारघर येथे केले. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून दिनांक ०१ ते ०४ मे रोजी पर्यंत खारघर भाजपच्यावतीने खारघर मधील सेक्टर १२ येथील गावदेवी मैदानावर मनोरंजन, इतिहास, कला तसेच महाराष्ट्राच्या विविध भागातील मिसळ महोत्सवाचा संगम असलेला 'भाजपा सांस्कृतिक महोत्सव' आयोजित करण्यात आला असून या महोत्सवाचे उदघाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, हर्षदा उपाध्याय, साधना पवार, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, दीपक शिंदे, विजय पाटील, वासुदेव पाटील, युवा मोर्चाचे खारघर अध्यक्ष नितेश पाटील, संतोष शर्मा, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, अमर उपाध्याय, यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या महोत्सवात इतिहास प्रेमींसाठी शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. उद्घाटन सोहळ्याच्या दिवशी ९० कलाकारांच्या संचातर्फे 'महाराष्ट्राची महासंस्कृती' हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यात महाराष्ट्राच्या विविध भागातील परंपरागत नृत्य, लोककला, संगीत, तसेच शिवराज्याभिषेक सोहळ्याचे जिवंत सादरीकरण करण्यात आले. "महाराष्ट्राची महासंस्कृती" या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या लोककला, लोकसंगीत, कोळीगीत, गणगवळणी, लावणी, पालखी, अभंग, पोवाडा, बहुरंगी संगीत आणि नृत्य रचनांनी मंत्रमुग्ध होतानाच विशेषतः यावेळी सादर झालेला "शिवराज्याभिषेक सोहळा" उपस्थितांना महाराजांच्या सुवर्णकाळाचा अनुभव देऊन गेला. तसेच या महोत्सवात चारही दिवस सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत कोल्हापूर, सातारा, वऱ्हाडी, नाशिक, मुंबई, पुणेरी चविष्ट मिसळ महोत्सवही आयोजित करण्यात आला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या महोत्सवाच्या आयोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर व खारघर भाजपचे कौतुक केले. फक्त मनोरंजनच नाही तर शिवकालीन शस्त्र प्रदर्शन तसेच संस्कृतीची जोड या महोत्सवात देण्यात आली आहे. आयोजन अत्यंत सुंदर आणि नियोजनबद्ध असल्याने राज्याचा नव्हे तर राष्ट्रीय कार्यक्रम असल्याचे अधोरेखित होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्राची संस्कृती आपण जन्मजात जगत आहोत त्यामुळे महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान प्रत्येकाला आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगत महाराष्ट्र दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

संपादकीय

एकीकडे उष्णतेची लाट;तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!!

बदलते हवामान व उष्णतेची लाट यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होतांना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाढत्या उष्णतामानामुळे राज्यातील जल साठा आतापासूनच ३८ टक्क्यांवर येवून ठेपला आहे आणि पुढील दोन महिने अजून बाकी आहे त्यामुळे जलसाठ्याची घसरगुंडी अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. कारण पुणे, विदर्भ, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मराठवाडा येथील संपूर्ण मोठ्या धरणांचा जलसाठा झपाट्याने खाली घसरत आहे. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील अनेक भागातील नागरिक सापडल्याचे दिसून येते.त्यामुळे आतापासूनच पाण्याचे गांभीर्य लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून योग्य वापर करण्याची गरज आहे.कारण राज्यातील जलसाठ्याची आकडेवारी पहाली तर अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे ती याप्रमाणे नागपूर ३९ .२७ टक्के, अमरावती ४८.९६ टक्के, पुणे ३२.७० टक्के, छत्रपती संभाजीनगर ३८.७७ टक्के, नाशिक ४२.६४ टक्के कोकण ४८.४१ अशाप्रकारे प्रमुख शहरातील जलसाठ्याची स्थिती आहे आणि दररोज झपाट्याने साठा कमी-कमी होत आहे यावर सरकारने ताबडतोब गांभीर्याने लक्ष केंद्रित करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील दोन महिन्यांत यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही.आज राज्यातच नाही भारतासह संपूर्ण जगात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे परिस्थितीनुसार पाण्याचा वापर होणे अत्यंत गरजेचे आहे.आज पाणी टंचाईची समस्या जगातील इतर अनेक ठिकाणांसारखीच थायलंडमध्येही आहे.मात्र त्यामुळे सण साजरा करण्याच्या उत्साहात अडचण येऊ नये म्हणून फॉगी स्प्रे,ईको-फ्रेंडली वॉटर गन्ससारख्या गोष्टींचा वापर केला जातो.म्हणजे सणाच्या निमित्ताने सुध्दा पाण्याची बचत केली जाते ही बाब थायलंड कृतीतून सिद्ध होते.त्यामुळे भारतात उन्हाळ्यातील पाण्याची गंभीर समस्या पहाता पाण्याचा एक-एक थेंब वाचविणे अत्यंत गरजेचे आहे.आज महाराष्ट्रासह भारतातील अनेक ग्रामीण भागात पाण्याची गंभीर समस्या आहे.कारण आजही ग्रामस्थांनांना पाण्यासाठी ३ ते ४ किलो मिटर अंतरापर्यंत वनवन हिंडावे लागते ही संपूर्ण परिस्थिती बदलते हवामान, जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वनवे लागने, ग्लोबल वॉर्मिंग,समुद्राची पातळी वाढने या संपूर्ण गोष्टींमुळे भुजल साठा दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो. आजही आपण पहातो की वाड्यांना टॅंकरने पाणीपुरवठा होत आहे म्हणजे पाणी समस्ये गंभीर रूप धारण केले असून पुढे चालून आक्राळविक्राळ रूप धारण करू शकते यालाही नाकारता येत नाही. कारण आजही राज्यासह देशातील अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेड झोनमध्ये असल्याचे सांगितले जाते.कारण संपूर्ण सृष्टी, मनुष्य, संपूर्ण जीवजंतू पाण्याशिवाय जगूच शकत नाही त्यामुळे सरकारने पावसाळ्यात पाणी अडविण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे, पाणी जमीनीच्या पोटात गेले पाहिजे यासाठी युध्दपातळीवर वृक्षलागवड काळाची गरज आहे,औद्योगिकीकरणावर सरकारने लगाम कसली पाहिजे, वाढते शहरीकरण यावरही अंकुश लागायला हवा.कारण निसर्ग सुखरूप रहाला तर सर्वच काही ठीक राहील अन्यथा विनाशकारी प्रक्रिया दिवसेंदिवस वाढतच जाईल म्हणून पाण्याच्या बाबतीत सरकारने सावधगिरीने पाऊल उचलने गरजेचे आहे.वृक्षतोडीची झळ सर्वांनाच भोगावी लागते ही बाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कृतीतून सांगितली.नागपूर शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील अनेक भागांत नागपूर महानगरपालिकेव्दारे वृक्षतोड केली जात आहे.पण बदल्यात वृक्षारोपण मात्र शहराच्या बाहेर केले जात असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोंदविण्यात आले. शहरातील झाडे तोडली जात असल्यास शहराबाहेर वृक्षारोपण काय कामाचे, अशा शब्दात नागपूर खंडपीठाने महापालिकेला खडसावत क्रीडा संकुलासह इतर ठिकाणी प्रस्तावित वृक्षतोडीवर अंतरिम स्थगितीही दिली आहे.१ हजार ३७४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव असून या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे.या वृक्षतोडीच्या बदल्यात गोरेवाड्यात वृक्षारोपण करणार असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली.वृक्षतोड शहरात करायची आणि वृक्षारोपण शहराबाहेर करायचे, हे चालणार नाही असे न्यायालयाने मौखिकपणे नमूद केले. यावरून आपण समजू शकतो की वृक्षतोडीमुळे पाण्यासह जीवनाशी निगडित अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.शहरातील वृक्ष तोडायचे आणि शहराबाहेर वृक्षारोपण करायचे याला काय अर्थ?अशा शब्दातही उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिकेला खडसावले.यावरून लक्षात येते की शहरीकरणाच्या नावाखाली नागपूरसह राज्यातील अनेक भागांत वृक्षांची कत्तल सुरु आहे ही बाब सिद्ध होते आणि आज राज्यात किंवा देशात जी पाण्याची समस्या भेडसावत आहे व पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त वृक्षतोड व जंगलतोड होय.वृक्ष कटाई पाच मिनिटांत होते.परंतु एक वृक्ष लावून मोठे करायला पाच वर्षे लागतात याचे गांभीर्य सरकारने लक्षात ठेवून जलसंपदा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने सर्वच स्तरातून वृक्षलागवडीवर भर देण्याची गरज आहे.सरकारमार्फत जेवढी झाडे तोडायची असेल त्याच्या दुप्पट वृक्षलागवड सरकारने प्रथम करावी;नंतर वृक्ष तोडण्याचा निर्णय द्यावा.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)नागपूर.

शेणखताला आला सोन्याचा भाव ऊस उत्पादकांकडून मोठी मागणी

दैनिक युवक आधार
प्रशांत तांबोळकर लातुर

शिरूरआनंतपाळ : शेती वाचवण्यासाठी, शेतजमिनीचा पोत सुधारण्यासाठी शेणखताचा वापर महत्त्वाचा असून, शेतकरी मिळेल त्या किमतीला शेणखत विकत घेऊ लागले आहेत. शिरूरअनंतपाळ तालुक्यातील येरोळसह विविध गावांतील शेतकऱ्यांकडून शेणखताला मोठी मागणी वाढली आहे.जनावरांना लागणारी वैरण, सुग्रास, पेंड आणि औषधे, मजुरीचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामानाने दुधाचे दर वाढत नाहीत. दूध धंदा परवडत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी जनावरे पाळणे कमी केले. आता तर गाई, म्हशीचे दर गगनाला भिडले आहेत.परिणामी गाई, म्हशींपासून मिळणारे शेणखत बंद झाले. याचा फटका शेतीला बसला आहे. शेतकऱ्यांना शेणखताचे महत्त्व लक्षात आले असून पुन्हा मिळेल तिथून आणि मिळेल त्या भावात शेणखत विकत घेऊन ते शेतात टाकले जात आहे.एक हायवा ट्रक शेणखत शेतात पसरविण्यासाठी मजुरांना तीन हजार सहाशे रुपये मजुरी द्यावी लागत आहे तर हायवा ट्रक शेणखताची किंमत १८ ते २० हजार रुपये आहे. ट्रॅक्टर शेनखत भरणे व वहातुक भरण्यासाठी दिड हजार रुपये मजुरी द्यावी लागत आहे. अशी माहिती येरोळ येथील ट्रॅक्टर मालक नंदकुमार साकोळकर यांनी दिली.या शेनखताला सर्व प्रथम ऊस उत्पादक शेतकरी, केळी उत्पादक व भाजीपाला पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांकडून मागणी वाढत आहे. बांधावर टाकलेले खत शेतात पसरवण्यासाठी मजुरांना रोजगार उपलब्ध झाला आहे. मोठे शेतकरी केवळ दुभत्या गाई व म्हैशी शेणखतासाठी पाळू लागले आहेत.

शेणखताच्या ट्रॉलीला साडे तीन हजार रुपयाचा भाव...

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळगावासह पांढरवाडी,कारेवाडी, सुमठाणा,नागेवाडी, बोळेगाव, साकोळ, राणी अंकुलगा, आजणी, तळेगाव,नागेवाडी, पर्यंत अनेक लहान वाड्या- वस्त्यांपर्यंत जाऊन शेतकरी शेणखत गोळा करू लागले आहेत. त्यामुळे ज्यांच्याकडे शेती नाही परंतु दुभती जनावरे आहेत अशा लोकाकडुन शेतकरी शेनखत विकत घेऊ लागले आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या संघर्षाला दिलासा; खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्तक्षेपाने उसर प्रकल्पग्रस्तांचे उपोषण स्थगित

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा : प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर मिळाले आश्वासन; साखळी उपोषणाला तात्पुरती विश्रांती उसर गेल इंडिया लिमिटेड कंपनीकडून प्रकल्पग्रस्तांना नोकरी व उपजीविकेपासून दूर ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ सुरू असलेले साखळी उपोषण अखेर स्थगित करण्यात आले आहे. रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेत समाधानकारक आश्वासने मिळाल्याने आंदोलन तात्पुरते थांबवण्यात आले, अशी माहिती उसर संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांनी दिली.दि. 23 एप्रिलपासून उसर गेल इंडिया कंपनीच्या गेटसमोर प्रकल्पग्रस्तांनी साखळी उपोषण व कामबंद आंदोलन सुरू केले होते. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास 'भिक मागो' आंदोलनाची चेतावणीही देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांनी दि. 28 एप्रिल रोजी समन्वय बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. ठरल्याप्रमाणे, सोमवार दि. 28 एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस खासदार सुनिल तटकरे, जिल्हाधिकारी रायगड, पोलीस उपविभागीय अधिकारी, रेवदंडा पोलीस ठाण्याचे स.पो.नि. श्रीकांत किरविले, उसर गेल इंडिया लि.चे अधिकारी, तसेच आंदोलन समितीचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित

होते.या चर्चेत खालील ठराव संमत करण्यात आले.1. प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र शासनाच्या नियमांप्रमाणे नोकरीत प्राधान्य देण्यात येईल. 2. गेल कंपनीच्या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये प्रथम प्रकल्पग्रस्त, त्यानंतर गावातील स्थानिक, ग्रामपंचायतच्या शिफारशीनुसार, आणि शेवटी बाहेरील कामगारांची नियुक्ती करण्यात येईल.3. उसर गेल इंडिया कंपनीत एम.06 प्रकारातील वाहनांना प्राधान्याने संधी देण्यात यावी.या ठरावानंतर रेवदंडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्रीकांत किरविले यांनी आंदोलनकर्त्यांना नारळपाणी देत उपोषणाची सांगता केली.या आंदोलनामध्ये समितीचे अध्यक्ष निलेश गायकर, उपाध्यक्ष दत्तात्रेय ठाकूर, कार्याध्यक्ष अनंत शिंदे, जनरल सेक्रेटरी निखिल पाटील, सेक्रेटरी आशिष नाईक, संघटक योगेश गुजर, खजिनदार गिरीश पाटील, सहखजिनदार भरत नाईक, सहसंघटक प्रमोद धसाडे यांच्यासह अनेक सदस्यांचा सक्रीय सहभाग होता.

छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर संपन्न,

शालेय विदयार्थ्यांना मिळाली गावातच विविध दाखले

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून 1 मे रोजी महसूल विभागाच्या वतीने शेतकरी, विदयार्थी, महिला यांच्या दैनंदिन प्रश्नाचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी तसेच महसूल प्रशासन लोकाभिमुख गतीमान करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे महसूल मंडळ विभाग पळस्पे अंतर्गत तलाठी सजा पळस्पेमधील ग्रामपंचायत कार्यालय पळस्पे तसेच खेरणे, आकुर्ली, कुंडेवहाळ येथे आयोजित केले गेले. किशन जावळे (भा. प्र.से) जिल्हाधिकारी रायगड व पवन चांडक उपविभागीय अधिकारी,पनवेल यांचे मार्गदर्शनाखाली तहसिलदार पनवेल विजय पाटील यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. नायब तहसिलदार संजय भलेराव, शशिकांत सानप मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी/तलाठी प्रिया वैती, सचिन पवार, अनिता पवार, हसूराम वाघ, अमित ताथवडे, प्रविण दड्डेकर, ग्राम पंचायत अधिकारी,पळस्पे सुदीन पाटील कृषी विभागाचे प्रदीप, छत्रपती शिवाजी विदयालय पळस्पेचे मुख्याध्यापक चिखलेकर, पी.जी.पाटील, नरेश भगत पोलीस पाटील यांच्यासह पंचक्रोशितील शेतकरी व विदयार्थीची उपस्थिती होती. यावेळी शालेय विदयार्थीना जातची प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन दाखले अशी विविध दाखले गावातच देण्यात आली. मयतांच्या वारसांना जिवंत सात बारा वाटप करण्यात आली. शेतकरी बांधवाची अग्रीस्टॅक नोंदणी करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत कार्यालय पळस्पे यांच्या वतीने नागरिकांना जन्म व मृत्यू दाखले वितरण करण्यात आली. कृषी विभागाच्याकडून शासनाच्या विविध योजनाची माहिती देण्यात आली. मंडळ अधिकारी पळस्पे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक करून

शासनाच्या जिवंत सात बारा मोहिम, पालकमंत्री पानंद रस्ते, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, ई पीक पाहणी, लक्ष्मी मुक्ती योजना, पीम किसान योजना अश्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. गावातच दाखले मिळाल्यामूळे विदयार्थी व त्यांच्या पालकांनी तहसिल कार्यालयाचे आभार मानले. तर महाराष्ट्र शासनाच्या या नावीन्यपुर्ण योजना छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर घेतल्यामुळे शेतकऱ्यात समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

दिलीप आमले यांचा व्यसनमुक्ती जनजागृती आणि सामाजिक कार्याची दखल घेत वारकरी संप्रदायाच्या वतीने आदर्श रायगड भुषण पुरस्कार

दैनिक युवक आधार
नेरुळ प्रतिनिधी : कीर्तनकार हभप अक्षय महाराज भोसले,नामदार श्री.भरतशेठ गोगावले,आकाश महाराज भोंडवे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आला. शिव पुण्य श्लोक ३४५ पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम किल्ले श्री रायगड या पवित्र ठिकाणी वारकरी धार्मिक सामाजिक तसेच गेल्या २ दशके व्यसनमुक्ती जनजागृती मोफत अभियान राबविण्यात देवदुत गोरगरीबाचे संसार व्यसनाधीन लोकमुळे रसातळाला जातात म्हणून व्यसनमुक्त जिवन काळाची गरज धेय्य उराशी बाळगून कुठल्याही आर्थिक सहकार्यची अपेक्षा न बाळगता व्यसन मुक्त राहावे म्हणून नागरिक युवक यांच्या बरोबर संवाद मार्गदर्शन करणारे श्री दिलीप किसनराव आमले (आपला माणूस) अध्यक्ष

शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांना रायगड भुषण वारकरी संप्रदायाच्यावतीने आदर्श रायगड भूषण व्यसनमुक्ती जनजागृती पुरस्कार शाल श्रीफळ मानपत्र सन्मानचिन्ह नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अत्यंत जवळचे वारकरी संप्रदायातील किर्तनकार हभप अक्षय महाराज भोसले अध्यक्ष आध्यात्मिक वारकरी सेना महाराष्ट्र राज्य , नामदार श्री भरतशेठ गोगावले साहेब ,रोजगार हमी फलोत्पदन खार भुमी मंत्री महाराष्ट्र राज्य, रायगड पुत्र हभप आकाश महाराज भोंडवे यांच्या शुभहस्ते यावेळी २२ जिल्ह्यातील हजारो शिवभक्त रायगड किल्ला येथे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा प्रमुख सत्र न्यायाधीश गोसावी यांच्याहस्ते लोटिस्मात श्रीब्रह्मेन्द्रस्वामींच्या तैलचित्राचे अनावरण

दैनिक युवक आधार
योगेश सुतार

चिपळूण प्रतिनिधी : लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराच्या कलादालन प्रकल्पांतर्गत, श्रीब्रह्मेन्द्रस्वामींच्या तैलचित्राचे अनावरण जिल्हा प्रमुख सत्र न्यायाधीश गोसावी यांच्याहस्ते अक्षय्यतृतीयेस करण्यात आले.जिल्हा प्रमुख सत्र न्यायाधीश गोसावी यांनी वाचनालयाच्या उपक्रमांचे कौतुक केले. वाचनालयाच्या बाळशास्त्री जांभेकर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला परशुराम देवस्थानच्या विश्वस्त समितीचे अध्यक्ष जीवन रेळेकर, विश्वस्त डॉ. प्रशांत पटवर्धन, वाचनालयाचे उपाध्यक्ष सुनील खेडेकर, कार्याध्यक्ष धनंजय चितळे, संचालक धीरज वाटेकर, मधुसूदन केतकर, प्रकाश घायाळकर उपस्थित होते.श्रीब्रह्मेन्द्रस्वामी यांनी इ.स. १७१० साली मंदिराचा जीर्णोद्धार करून आजचे भव्य स्वरूप दिले. त्यांनी आखून दिल्याप्रमाणे गेली तीनशे वर्षे भगवान परशुरामांचा जन्मोत्सव साजरा होतो. पेशवाईत ब्रह्मेंद्रस्वामी यांचे मोठे प्रस्थ होते. आदी माहिती यावेळी इतिहासाचे व्यासंगी अभ्यासक प्रकाश देशपांडे यांनी दिली.

जातनिहाय जनगणना हा ऐतिहासिक आणि देशहिताचा निर्णय- आ.प्रशांत ठाकूर

पनवेल भाजपकडून जोरदार स्वागत आणि जल्लोष

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

भारत सरकारने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जात निहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अधिकृत घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली असून या महत्वपूर्ण निर्णयाचा पनवेल भारतीय जनता पार्टीच्यावतीने जोरदार स्वागत करत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारचे अभिनंदन व आभार मानण्यात आले. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल तालुका व शहर भाजप कार्यालय येथे झालेल्या या जल्लोष कार्यक्रमात पेढे भरवून आणि फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत,

माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, एकनाथ गायकवाड, प्रभाकर बहिरा, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, अमित ओझे, रुपेश नागवेकर, केदार भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, नीता माळी, ज्योती देशमाने, शिवकर सरपंच आनंद ढवळे, सुनील पाटील, के.सी.पाटील, अक्षय सिंग, महेश पाटील, महेश सरदेसाई, अशोक मोटे, अविनाश गायकवाड, कर्णा शेलार, संदीप पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले कि, देशाचे व जगातील कार्यक्षम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे आणि हा इतिहासातील महत्त्वाचा टप्पा आहे. १९३१ नंतर प्रथमच जातनिहाय राष्ट्रीय जनगणना केली जाणार आहे. या निर्णयामुळे सामाजिक न्यायाच्या योजनांमध्ये सुधारणा होऊन समाजातील दुर्बल घटकाला पुढे आणण्याचा प्रयत्न आणि त्या पर्यायाने समाजाच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे, असे सांगतानाच काँग्रेसने श्रेय घेण्याचा प्रयत्न केला आहे, ५० वर्षे सत्ता होती मग या काळात जातनिहाय जनगणना का केली नाही असा सवाल उपस्थित करतानाच काँग्रसेचे बेगडी प्रेम यातून स्पष्ट होत असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद करत जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी व सरकारचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी म्हंटले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने हा निर्णय घेऊन सर्वसामान्य माणसाला मोठा दिलासा दिला आहे. तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या विकासासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र या निर्णयाचा जल्लोष पाहून काँग्रेसच्या पोटात दुखायला लागले आहे. राहुल गांधींची मागणी होती असे काँग्रेसकडून बोलले जाते मग घरात तब्बल ५० वर्षे सत्ता होती तेव्हा का निर्णय घेतला नाही असा सवाल करत काँग्रेसची फडफड आणि खोटा मुखवटा समोर असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधानानुसार कार्य करत असतात त्यामुळे हा निर्णय सामाजिक न्याय पर्व आहे असेही अविनाश कोळी म्हणाले.

गुड लाईफ केंद्रामध्ये लग्न वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

दैनिक युवक आधार
सुरेश भोईर(कार्यकारी संपादक)

दिनांक २ मे २०२५ रोजी नवीन पनवेल येथील शिवा कॉम्प्लेक्स येथे गुड लाईफ आरोग्य केंद्रामध्ये आबासाहेब जाधव व संध्या जाधव या दापत्यांचा १२वा लग्न वाढदिवस केक कापून मोठ्या उत्साहात साजरा केला व आशीर्वाद देऊन पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी गुड लाईफ आरोग्य केंद्राचे सल्लागार विनोद सोलंकी गजानन कदम उजाला शर्मा राहुल पाल अनिल कदम अनिल परब क्रांती जाधव प्रसाद काते शांताराम आहेर अश्विनी मोरे सनिप कलोते सुरेश भोईर रंजना भोईर नयन भोईर आरती भोईर मनीषा पवार सरिता सोनवणे अनिशा कदम वंदना,तारेकर,व गुड लाईफ केंद्राचे निशुल्क सेवा करणारे सेवक व सर्व सदस्य उपस्थित होते.

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

दिग्दर्शक-निर्मात्याविरुद्ध दादासाहेब फाळके चित्रपट युनियनची मोठी कारवाई

कामगार दिनी युनिटकडून सक्तीचे काम करून घेतल्यामुळे शूटिंग बँड; पोलिसांकडे दिली तक्रार

दैनिक युवक आधार
किशोर रमाकांत गुडेकर,
मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख

मुंबई (दि. १ मे) – कामगार दिनाच्या दिवशी युनिटकडून सक्तीने काम करून घेतल्याच्या पार्श्वभूमीवर दादासाहेब फाळके चित्रपट युनियनने मोठी कारवाई करत संबंधित दिग्दर्शक व निर्मात्याविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.ही घटना मालाडच्या मढ भागातील 'आर्य बंगला' येथे 'रणांगण' या प्रोजेक्टच्या शूटिंगदरम्यान घडली. 'रस्क मीडिया प्रायव्हेट लिमिटेड' या प्रॉडक्शन हाऊसअंतर्गत हे चित्रीकरण सुरू होते. मात्र, कामगार दिन असूनही युनिटकडून परवानगीशिवाय सक्तीने काम करून घेतल्याचे समोर आल्यानंतर युनियनने तात्काळ पाऊल उचलले. प्रॉडक्शन हाऊसच्या दक्षता विभागातील विवेक पाल (मालाड विधानसभेचे अध्यक्ष) आणि संदेश गव्हाणे (मुंबई उपनगर सचिव) यांनी या प्रकरणी पुढाकार घेतला. युनियनने शूटिंग थांबवत पोलिसांत तक्रार दाखल केली असून, संबंधित दिग्दर्शक व निर्माता यांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

युनियनच्या या कडक भूमिकेमुळे चित्रपटसृष्टीत खळबळ उडाली आहे. कामगारांच्या हक्कांचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही, असा स्पष्ट संदेश युनियनने दिला आहे.

खरीप हंगाम 2025 पूर्व तयारी आढावा बैठक नांदेड येथे पालक मंत्री मा.ना.अतुलजी सावे साहेब

खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

नांदेड -: आज महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय अतुलजी सावे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम 2025 पूर्वतयारी आढावा बैठक या बैठकीमध्ये जिल्ह्याचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण, यांनी पालकमंत्री महोदयाकडे जिल्ह्यातील कृषी पिकावर आधारित केळी प्रक्रिया केंद्र बारड ता.मुदखेडमिरची संशोधन केंद्र धर्माबाद ता.धर्माबाद सोयाबीन संशोधन प्रक्रिया कासराळी ता.बिलोली येथे उभारणी करावी अशी मागणी या बैठकीच्या अनुषंगाने पालकमंत्री महोदयाकडे केली. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण साहेब, राज्यसभा सदस्य अजित गोपछडे साहेब,आमदार राजेश पवार, आमदार जितेस अनंतापुरकर, आमदार श्रीजय चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, यासह कृषी अधिकारी वैद्यकीय अधिकारी पोलीस अधिकारी उपस्थित होते.

नेताजी सुभाष विद्यालय,मानवत येथील इयत्ता दहावी बॅच २००२ तर्फे शाळेस मदतीचा हात.

दैनिक युवक आधार
वार्ताहर

असं म्हणतात आई-वडिलांच्या आणि शाळेच्या ऋणातून कधीच मुक्त होता येत नाही कारण जीवन जगण्याच्या शर्यतीत अनेक चढ-उतार पार करण्याचे सामर्थ्य आई वडील देतात आणि शिक्षणाच्या बळावर आकाशाला गवसणी घालण्याचे कौशल्य शाळा देत असते. शाळेचे उपकार फेडणे शक्य जरी नसले तरीही एक छोटासा प्रयत्न म्हणून मानवत येथील नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००२ मध्ये दहावी उत्तीर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी शाळेतील विज्ञान प्रयोगशाळा नूतनीकरणासाठी मदतीचा हात पुढे करून आदर्श ठेवला आहे. १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत सर्व वर्गमित्रांनी एकत्र येऊन मानवीय अवयवांची प्रतिकृती,कृत्रिम मानवीय सापळा,प्रयोगास लागणारी विविध रसायने,मायक्रोस्कोप,जगाचा नकाशा आणि इतर वस्तू असे ७०,०००/- किमतीचे प्रयोगशाळा साहित्य शाळेस सुपूर्द केले याप्रसंगी शाळेतील शिक्षक वर्ग आणि ने.सु.वि. २००२ बॅचचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. "शाळेला समाजाचा आधार लागतो आणि समाजाला शाळेचा अभिमान असावा ह्या दोन्ही गोष्टी तुमच्या एका कृतीतून साध्य झाल्या" असे म्हणत विद्यार्थ्यांच्या शाळेबद्दल असणाऱ्या जाणीव आणि प्रेमाबद्दल सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले या छोटेखानी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री.डॉक्टर डोंबरे सर,सूत्र संचालन श्री.होगे सर आणि अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री.संजय लाड सरांनी केले.

नवी मुंबईत 'एबीसी चिल्ड्रेन्स कॉन्क्लेव्ह २०२५' चे आयोजन

मुलांचे वैद्यकीय आरोग्य, डिजिटल सुरक्षा आणि आरोग्याशी संबंधित मुद्द्यांवर जागरूकता वाढवण्याच्या उद्देश

दैनिक युवक आधार
नवी मुबंई प्रतिनिधी

नवी मुंबई, २ मे २०२५ : अपोलो चिल्ड्रेन्स नवी मुंबई (एएचएनएम) एबीसी चिल्ड्रेन्स कॉन्क्लेव्ह २०२५ च्या निमित्ताने, लहान मुलांच्या आरोग्याशी संबंधित मुद्द्यांवर जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने अनेक समुदाय-केंद्रित उपक्रम सुरु करत आहे. हॉस्पिटलचे हे प्रयत्न, वैद्यकीय देखभाल आणि सामुदायिक आउटरिच दोन्हींच्या माध्यमातून बाल आरोग्य आणि कल्याण यामध्ये सुधारणेप्रती हॉस्पिटलची वचनबद्धता मजबूत करत आहेत. या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या आयोजनाचा एक भाग म्हणून, अपोलो चिल्ड्रेन्सने नवी मुंबईमध्ये अनेक महत्त्वाच्या पैलूंची सुरुवात केली आहे. मोबाईल फोनचे व्यसन, जंक फूड आणि सामान्य आरोग्य इत्यादी गंभीर आरोग्य चिंता दूर करणे हा या उपक्रमांचा उद्देश आहे. अपोलो चिल्ड्रेन्स नवी मुंबईद्वारे बॉस्टन चिल्ड्रेन्स हॉस्पिटल (यूएसए), इंडियन अकॅडेमी ऑफ पीडियाट्रिक्स (आयएपी) आणि नवी मुंबई असोसिएशन ऑफ पीडियाट्रिक्स (एनएमएपी) च्या सहयोगाने एबीसी चिल्ड्रेन्स कॉन्क्लेव्ह २०२५ चे आयोजन ३-४ मे २०२५ रोजी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ऑरिका हॉटेलमध्ये करण्यात येईल. या दोन दिवसांच्या संमेलनात पीडियाट्रिशियन, रिसर्चर आणि

हेल्थकेयर इनोव्हेटर सहभागी होतील आणि वैद्यकीय प्रगती, आजच्या काळातील आरोग्य सेवा गरजा आणि मुले व कुटुंबांना लाभ प्रदान करणाऱ्या शाश्वत आरोग्य सेवा प्रणाली तयार करणाऱ्या धोरणांबाबत चर्चा करतील.

संमेलनपूर्व उपक्रमांची प्रमुख वैशिष्ट्ये:

एबीसीसी सोशल कनेक्ट : नवी मुंबई असोसिएशन ऑफ पीडियाट्रिक्सचे पीडियाट्रिशियन नवी मुंबईमध्ये स्टडी सेंटर्सना भेटी देतील आणि मुले व पालकांसोबत मोबाईलचा खूप जास्त वापर व जंक फूडच्या सेवनाच्या हानिकारक प्रभावांबाबत चर्चा करतील. या भेटींमध्ये डॉक्टर आवश्यक आरोग्य सल्ले देऊ शकतील आणि मुले व कुटुंबांमध्ये निरोगी जीवनशैली पर्यायांना प्रोत्साहन देऊ शकतील. या उपक्रमाचा एक भाग म्हणून तक्षशिला प्रबोधिनी सामाजिक संस्था स्टडी सेंटर्सना दप्तरे, वह्या, रिचार्जेबल लाईट्स आणि फळा इत्यादी शैक्षणिक मदत पुरवेल.

'बचपन' - पालक आणि मुलांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींसाठी सामुदायिक कार्यक्रम: हा संवादात्मक कार्यक्रम आईवडील आणि मुलांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींना बाल विकास, भावनात्मक कल्याण आणि प्रभावी पालन पोषण धोरणांबाबत व्यावहारिक ज्ञान देण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे. 'बचपन'चे नेतृत्व पीडियाट्रिशियन करत आहेत आणि प्रसिद्ध संस्थांच्या आंतरराष्ट्रीय फॅकल्टीचा सहयोग यामध्ये मिळत आहे. यामध्ये मुलांच्या वैद्यकीय देखभालीविषयी जागतिक दृष्टिकोन प्रस्तुत केला जाईल आणि आजच्या घाईगडबडीच्या, डिजिटल जगात मुलांच्या निरोगी, सुव्यवस्थित, स्थिर पालनपोषणाबाबत माहिती दिली जाईल. डॉ अनुपम सिबल, डायरेक्टर, सिनियर पीडियाट्रिक गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट-हेपेटोलॉजिस्ट, अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप यांनी सांगितले,"एबीसी चिल्ड्रेन्स कॉन्क्लेव्ह २०२५ पीडियाट्रिक देखभाल आणि नावीन्य यामध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे, जिथे नवनवीन संशोधन, वैद्यकीय प्रगती आणि क्लिनिकल विशेषज्ञता मुलांसाठी निरोगी भविष्याला आकार देतात. संशोधन आणि करुणा यांची सांगड घालून आम्ही हे सुनिश्चित करत आहोत की, प्रत्येक मुलाला सर्वोत्तम संभव देखभाल मिळावी. अपोलो हॉस्पिटल्सला अभिमान आहे की, ते या प्रयत्नांमध्ये सर्वात पुढे आहेत." डॉ विजय येवले, पीडियाट्रिक्सचे सिनियर कन्सल्टन्ट-एचओडी, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी सांगितले,"अपोलो हॉस्पिटल्समध्ये आमचा दृष्टिकोन स्पष्ट आहे, आम्ही प्रत्येक मुलासाठी सुपरस्पेशालिटी पीडियाट्रिक देखभाल सहज, सुलभ बनवू इच्छितो. गेल्या काही वर्षांमध्ये कुटुंबांनी आमच्यावर जो विश्वास ठेवला आहे, त्यामुळे आम्ही मुलांच्या देखभालीमध्ये महत्त्वपूर्ण यश संपादन करू शकलो आहोत - २५ बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन, १७ किडनी ट्रान्सप्लान्टेशन, ६० लिव्हर ट्रान्सप्लान्टेशन, १०० पेक्षा जास्त मिनिमल इन्व्हेसिव्ह सर्जरी आणि २००० पेक्षा जास्त कार्डियाक प्रक्रिया आम्ही केल्या आहेत. अनेक अनोख्या केसेसमध्ये यशस्वी परिणाम संपादन केले आहेत - ३० पेक्षा जास्त निओनेटल कार्डियाक प्रक्रिया, एक्स्ट्रीम प्री-टर्म बाळांची देखभाल आमच्या तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे करू शकलो आहोत. आमच्या काटेकोर इन्फेक्शन डिसीज प्रोटोकॉलने आम्हाला इन्फेक्शन बेंचमार्कपेक्षा खूप कमी ठेवण्यात सक्षम बनवले आहे." डॉ मंगई सिन्हा, अध्यक्ष, नवी मुंबई असोसिएशन ऑफ पीडियाट्रिक्स (एनएमएपी) म्हणाल्या,"वास्तविक जागरूकता आणि शाश्वत परिवर्तन यांची सुरुवात तळागाळापासून होते. अपोलो हॉस्पिटल्ससोबत आमच्या सहयोगाच्या माध्यमातून आम्ही मुले आणि पालकांच्या जीवनात एक भरीव परिवर्तन आणत आहोत. या समुदायांमध्ये आम्ही जो संवाद करत आहोत, त्यामुळे निरोगी सवयी आणि मजबूत कौटुंबिक बंध विकसित होत आहेत. त्यावरून हे दिसते की, भविष्याला आकार देण्यात सामुदायिक भागीदारी खूप जास्त प्रभावी ठरू शकते."

हिल स्टेशन नाही, पंचतारांकित हॉटेल नाही वृद्धाश्रमात विवाहवर्धापनदिन साजरा करणाऱ्या रेवदंडा येथील दांपत्याचे समाजाला अनमोल शिकवण

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा

आजच्या तेजतर्रार, झगमगत्या दुनियेत विवाहवर्धापनदिन म्हणजे 'डेस्टिनेशन सेलिब्रेशन'–हिल स्टेशन, पंचतारांकित हॉटेल, सेल्फी आणि सोशल मीडियावरील पोस्ट्सचा काळ. पण या चमकधमकाच्या गर्दीतही काही चेहरे असे आहेत जे आपल्या नजरेखालून जात नाहीत–जे काहीसं वेगळं करतात, मनाला थेट भिडतात. रेवदंडा आंग्रेनगर येथील ॲड. रोहित भोईर आणि सौ. दीपाली भोईर या नवदांपत्याने आपल्या विवाहाच्या पहिल्या वाढदिवशी हा दिवस 'साजरा' न करता तो 'सार्थक' केला. अलिबाग जवळील परहूर येथील वृद्धाश्रमात जाऊन त्यांनी तेथील जेष्ठ नागरिकांच्या आशीर्वादाने आपल्या सहजीवनाचा एक वर्षांचा प्रवास साजरा केला. मोठ्या हॉटेलमधील केक नाही, न भव्य फोटोशूट पण वृद्धांच्या डोळ्यातील पाणी आणि त्यांच्या थरथरत्या हातांनी दिलेला आशिर्वाद–हाच खरा अमूल्य ठेवा!थोडा वेळ त्या जेष्ठांचा हात हातात घेऊन बोलण्यात, त्यांच्या आठवणी ऐकण्यात,

त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यात त्यांनी त्यांच्या वाढदिवसाचा अर्थ शोधला. सौ. दीपाली म्हणाल्या, "या सगळ्यांच्या रूपाने आम्हाला एक नवं, मोठं कुटुंब लाभलं. ह्याहून मोठं सुख कोणतं?" आज समाजात अशा कृतीची उणीव भासत असताना, हे जोडपं एक आदर्श ठरलं आहे. त्यांच्या कृतीतून हेच स्पष्ट होतं की, साजरा करण्यासाठी श्रीमंती नव्हे, तर संवेदनशील मन लागतं. रेवदंडा सारख्या छोट्याशा गावातून आलेल्या या जोडप्याने एक मोठा संदेश दिला आहे–आनंद वाटण्यात आहे, खर्चात नाही."आपणही आपल्या खास दिवशी कोणाला खास वाटू देऊया!"

नेताजी सुभाष विद्यालय,मानवत येथील इयत्ता दहावी बॅच २००२ तर्फे शाळेस मदतीचा हात.

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी

असं म्हणतात आई-वडिलांच्या आणि शाळेच्या ऋणातून कधीच मुक्त होता येत नाही कारण जीवन जगण्याच्या शर्यतीत अनेक चढ-उतार पार करण्याचे सामर्थ्य आई वडील देतात आणि शिक्षणाच्या बळावर आकाशाला गवसणी घालण्याचे कौशल्य शाळा देत असते. शाळेचे उपकार फेडणे शक्य जरी नसले तरीही एक छोटासा प्रयत्न म्हणून मानवत येथील नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००२ मध्ये दहावी उत्तीर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी शाळेतील विज्ञान प्रयोगशाळा नूतनीकरणासाठी मदतीचा हात पुढे करून आदर्श ठेवला आहे. १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत सर्व वर्गमित्रांनी एकत्र येऊन मानवीय अवयवांची प्रतिकृती,कृत्रिम मानवीय सापळा,प्रयोगास लागणारी विविध रसायने,मायक्रोस्कोप,जगाचा नकाशा आणि इतर वस्तू असे ७०,०००/- किमतीचे प्रयोगशाळा साहित्य शाळेस सुपूर्द केले याप्रसंगी शाळेतील शिक्षक वर्ग आणि ने.सु.वि. २००२

बॅचचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. "शाळेला समाजाचा आधार लागतो आणि समाजाला शाळेचा अभिमान असावा ह्या दोन्ही गोष्टी तुमच्या एका कृतीतून साध्य झाल्या" असे म्हणत विद्यार्थ्यांच्या शाळेबद्दल असणाऱ्या जाणीव आणि प्रेमाबद्दल सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले या छोटेखानी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री.डॉक्टर डोंबरे सर,सूत्र संचालन श्री.होगे सर आणि अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री.संजय लाड सरांनी केले.

चिपळूण नागरीचे अधिकारी व कर्मचारी वर्ग क्रिकेट स्पर्धेबरोबरच कामात स्पर्धा करून सिद्ध करतात

संस्थापक व अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांच्याकडून कौतुक

दैनिक युवक आधार
योगेश सुतार
चिपळूण प्रतिनिधी

चिपळूण नागरी प्रीमियम लीग २०२५ क्रिकेट स्पर्धेचे शानदार उद्घाटन*

चिपळूण :- सहकारात चांगल्या पद्धतीने काम कसं करावं आणि त्याच्यातून आपण आपलं जीवन कसं चांगलं ठेवावं हे आपल्याला शिकायला मिळतं तर संस्थेचे अधिकारी व कर्मचारी वर्ग क्रिकेट स्पर्धेबरोबरच कामाच्या बाबतीत तितकीच स्पर्धा करतात आणि आपल्या सिद्ध करतात आणि आपल्याला आनंद आहे की, आपण या स्पर्धेत सगळ्यांनी सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे त्यांना प्रतिसाद देताय आणि यापुढे अशाच पद्धतीने या संस्थेच्या कामकाजात आणि सगळ्या वाटचालीत तुम्ही सहकार्य करा, अशी अपेक्षा चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक व अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांनी चिपळूण नागरी प्रीमियम २०२५ क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केली. या स्पर्धेच्या

उद्घाटनापूर्वी पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना चिपळूण नागरी परिवार व उपस्थित मान्यवरांतर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. चिपळूण नागरी पतसंस्था आयोजित चिपळूण नागरी प्रीमियम लीग २०२५ क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांच्या हस्ते श्रीफळ फोडून झाले. याचबरोबर वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव, संचालिका सौ. स्मिता चव्हाण, काँग्रेसचे चिपळूण तालुकाध्यक्ष लियाकत शाह, सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय जाधव यांनीदेखील श्रीफळ वाढवला. तर मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी फित सोडली. यानंतर चिपळूण नागरी पतसंस्थेचे संस्थापक व अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी आपल्या मनोगतात चिपळूण नागरीच्या क्रिकेट स्पर्धेबरोबरच वाशिष्ठी डेअरीतर्फे जानेवारी महिन्यात आयोजित केले गेलेल्या कृषी महोत्सवाचे कौतुक केले. तर गेल्या वर्षी सावरकर मैदानाचे निमित्ताने रुपडे पालटलेले पाहून समाधान वाटले. यामुळे चिपळूण नागरी व वाशिष्ठी डेअरी प्रकल्प अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखवतो, हे सिद्ध झाले आहे. तर चिपळूण नागरीचे 'आपली माणसं, आपली संस्था,' हे ब्रीद वाक्य असून मला वाटतं मी त्याला पुढे एक शब्द जोडेन 'आपलं कुटूंब, आपली संस्था' अशा शब्दांत संस्थेच्या वाटचालीचे कौतुक केले. चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक व अध्यक्ष सुभाषराव चव्हाण, व्हाईस चेअरमन अशोक साबळे, संचालिका सौ. स्मिता चव्हाण, ॲड. नयना पवार, वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव, चिपळूण नागरीचे संचालक रवींद्र भोसले, सोमा गुढेकर, राजेश वाजे, मनोहर मोहिते, सत्यवान म्हामूनकर, राजेंद्र पटवर्धन, संचालिका श्रीमती नीलिमा जगताप, चिपळूण नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल भोसले, प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढाबकर, जनत जागुष्टे, अन्वर जबले, जनार्दन पवार, गुलजार कुरवले, अंकुश काते, केळणे गावचे माजी सरपंच संदीप कदम, ज्येष्ठ पत्रकार सतीश कदम, अनिल लोटनकर, दत्ता केळकर, माजी जि.प. विजय देसाई, काँग्रेसचे चिपळूण तालुकाध्यक्ष लियाकत शाह, वासुदेव मेस्त्री, खेर्डीच्या सरपंच सौ. सुगंधा माळी, माजी उपसरपंच सौ. प्रिया उतेकर, सौ. अंजली कदम, सौ. रुही खेडेकर, रमण डांगे, वैभव चव्हाण, शमुन घारे आदी उपस्थित होते. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी चिपळूण नागरीचे संस्थापक व अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य अधिकारी व कर्मचारी वर्ग मेहनत घेत आहेत. या स्पर्धेचे समालोचन प्रशांत आदवडे व अमोल टाकळे करीत आहेत.

स्व. भास्कर पाटील सामा. विकास संस्थेतर्फे भव्य हळदी कुंकू समारंभ व खेळ पैठणीचा.

दैनिक युवक आधार
उरण प्रतिनिधी
/हेमाली पाटील

दि. 02 मे 2025:- 01 मे हा सर्वत्र महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. याचे औचित्य साधून स्व. भास्कर पाटील सामाजिक व विकास संस्था कोप्रोली, उरण यांच्या वर्धापन दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त कोप्रोली गावात विशेष कार्यक्रम आयोजित केले होते. गुरुवार दिनांक 01 मे 2025 रोजी कोप्रोली येथे महिलांसाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन केले होते. गावातील विवाहित, अविवाहित अशा सर्वच मुली व स्त्रियांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. हळदी कुंकूचे वाण म्हणून प्रत्येकीला गुलाबाचे पुष्प, पितळेचा दिवा, आणि तीळगुळाचे वाटप करण्यात आले. दैनंदिन जीवनचर्यातून स्वतः साठी वेळ काढावा, या सोज्वळ उद्देशाने ऍडव्होकेट श्री. पर्जन्य चंद्रहास म्हात्रे व त्यांच्या सहचारिणी सौ. अक्षता पर्जन्य म्हात्रे या उभायंतांनी महिलांसाठी या समारंभाचे आयोजन केले होते. त्याच प्रमाणे आपल्यातील सुप्त गुणांना वाव मिळवून देण्यासाठी पैठणीचा खेळ घेण्यात आला. यात विविध मजेशीर खेळांची सांगड पाहायला मिळाली. तसेच लकी ड्रॉ मधून एका भाग्यविजेतीला घोषित करून पारितोषिक देण्यात आले. पैठणीचा खेळ जिंकणाऱ्या तीन विजेत्यांना भरघोस बक्षीसे दिली. प्रथम क्रमांकाचे बक्षीस SMART LED TV, द्वितीय क्रमांकास डिनर सेट तर तृतीय क्रमांकास मिक्सर ग्राइंडर तर प्रत्येक तिन्ही विजेत्यांना मानाची पैठणी व संस्थेचे सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. खेळ पैठणीचा या खेळात सौ. सुषमा कोळी -प्रथम, सौ. पुनम परदेशी -द्वितीय तर सौ. स्वप्नाली म्हात्रे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरल्या. तसेच 16 वर्षांवरील मुलींसाठीसुद्धा वेगवेगळे मजेशीर खेळ घेण्यात आले. यामध्ये अंतिम विजेती कु. परी म्हात्रे ठरली. हिस सरप्राईझ भेटवस्तू व सन्मानचिन्ह पारितोषिक म्हणून देण्यात आले. अशा स्वरूपात बक्षीसांची बरसात करण्यात आली. ऍडव्होकेट श्री. पर्जन्य म्हात्रे व सौ.अक्षता पर्जन्य म्हात्रे यांच्या

निःस्वार्थ औदार्य भावनेतून हा भव्य दिव्य असा सोहळा संपन्न होत असतो. त्यासाठी गावातील तमाम प्रेक्षक वर्गानी उपस्थिती दाखविली. श्री गणेश मंदिर कोप्रोली येथील प्रांगणात हसत खेळत रात्री उशीरापर्यंत हा खेळ रंगला होता. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रायगड भूषण, महाराष्ट्र भूषण नितेश पंडित सर यांनी केले. त्याचबरोबर या पैठणीच्या खेळासाठी रायगड भूषण पपन पाटील व शाम ठाकूर सरांचे निवेदन प्रेक्षकांना ऐकायला मिळाले.

घाटकोपर मध्ये नालेसफाई कामांना वेग ; पावसाळ्यापूर्वी विहित कालावधीत नालेसफाई पूर्ण करण्याचा ठेकेदाराचा प्रयत्न

दैनिक युवक आधार
घाटकोपर,(प्रतिनिधी);

पावसाळ्यापूर्वी विहित वेळेत नालेसफाईची कामे पूर्ण व्हावीत यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून प्रयत्न केले जात आहेत.तसेच घाटकोपर मनपा एन विभागातील नालेसफाई कामाचा सहाय्यक आयुक्त एन विभाग यांनी आढावा घेतला असून,त्यानुसार मनपा नियमावलीप्रमाणे काम करण्याविषयी नालेसफाईच्या संबंधित ठेकेदाराला निर्देशित केले गेले आहे.तसेच सदर नालेसफाईचे काम हे मनपा वेळापत्रकानुसार पावसाळ्यापूर्वी विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देखील त्यांनी संबंधितांना दिले असून,त्यानुसार नालेसफाईचा ठेकेदार ही विहित कालावधीत पावसाळ्यापूर्वी नालेसफाई पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे.त्यामुळे घाटकोपर मधील सर्वच विभागातील नालेसफाई कामाला वेग मिळाला आहे.याशिवाय घाटकोपर पश्चिम मधील डोंगराळ भागातील नाले हे पावसाळी पाणी विनाअडथळा वाहून जाण्यासाठी साफ असावेत या दृष्टीने सदर नाल्यांसह विविध विभागात अंतर्गत असलेल्या मोठ्या नाल्यांचीही पावसाळापूर्व नालेसफाई ठेकेदाराकडून वेगात सुरू आहे.तसेच घाटकोपर मधील रस्त्यालगत असलेल्या मोठ्या नाल्यातील गाळ नालेसफाईच्या ठेकेदाराकडून जेसीबीद्वारे काढला जात आहे.तसेच यानंतर नाल्यातील गाळ हा काठावर ठेवला जात असून गाळ काहीसा सुकून वाहतूक करण्यायोग्य झाल्यानंतर तत्परतेने त्या ठिकाणाहून गाळ हलविण्याची खबरदारी ठेकेदाराकडून घेतली जात आहे.त्यामुळे घाटकोपर मधील नालेसफाई कामांना वेग मिळाला दिसत आहे.

१ मे महाराष्ट्र कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी वरूड / जाफ्राबाद

दरवर्षी १ मे महाराष्ट्र दिन आपण जागतीक कामगार दिनही म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे या दिवशी महाराष्ट्र दिन साजरा होतो. जागतीक कामगार दिन ही म्हणाल्या जाते

जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथे विविध ठिकाणी १ मे महाराष्ट्र कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाचे प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले

यावेळी सरपंच सौ शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयाचे ध्वजारोहण करण्यात आले यावेळी उपस्थित ग्रामसेवक सी आय पठाण उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी जि प के प्रा शाळा भारज बू मुख्यध्यापक शिक्षक वर्ग आदी कर्मचारी व गावकरी व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

पनवेल तालुका क्रीडा संकुलात विनामूल्य उन्हाळी क्रीडा कौशल्य प्रशिक्षण व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे उद्घाटन

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर : महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरणांतर्गत पनवेल तालुका क्रीडा संकुलामध्ये उन्हाळी सुटीचा सदुपयोग साधत विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य क्रीडा कौशल्य प्रशिक्षण व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आमदार प्रशांत ठाकूर आणि ऑलिंपिक नेमबाज, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाचा जिजामाता क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार विजेत्या सुमा शिरुर यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटनप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर यांनी संकुलातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवण्याचा

संकल्प व्यक्त केला. संकुलातील सुविधांचे अद्ययावतिकरण करून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय नेमबाज प्राजक्ता अंकोलेकर (साऊथ एशियन गेम्स २०२२ कांस्य पदक विजेती) आणि मानवी शर्मा (राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड) यांचा सत्कार केला.

उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी खेळाडूंना तंदुरुस्त राहण्यासाठी खेळाकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले. "खेळ आणि शिक्षण हे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत," असे ते म्हणाले. सुमा शिरुर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "एक चांगला खेळाडू घडण्यासाठी मैदानावर उतरणे आवश्यक आहे. मी स्वतः विविध खेळ खेळले, एनसीसीमध्ये असताना प्रथमच बंदूक हातात घेतली आणि त्यानंतर मागे वळून पाहिले नाही. मेहनत आणि जिद्दीने आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचता येते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी शिबिराविषयी माहिती दिली. १० ते १२ वेगवेगळ्या खेळांचे प्रशिक्षण देणारे हे पहिले शिबिर असून दीड महिन्याच्या कालावधीत १५० पेक्षा अधिक खेळाडूंनी नोंदणी केली आहे. तालुका क्रीडा संकुल समितीमार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सहभागी खेळाडूंना विनामूल्य टी-शर्ट व शॉर्ट्स देण्यात आले आहेत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन यांनी प्रभावीपणे केले. या प्रसंगी अनेक मान्यवर, प्रशासनातील अधिकारी, खेळाडू आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थी, शिक्षक, पालक व सेवानिवृत्त शिक्षक सत्कार व सन्मान सोहळा संपन्न

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
: व्ही.के.हायस्कूल-पनवेल येथे कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व पं. स. पनवेलचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे या मान्यवरांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थी, शिक्षक, पालक व सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार व सन्मान सोहळा संपन्न झाला. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी, पनवेल तालुका स्तरीय क्रिडा व व्यक्तीमत्व

विकास स्पर्धा विजेते स्पर्धक, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, परसबाग स्पर्धा, माता पालकांसाठी पाककृती स्पर्धा, स्काऊट गाईड शाळा, शिष्यवृत्ती कार्यशाळा मार्गदर्शक शिक्षक, केंद्र आदर्श शिक्षक, दिव्यांग शिक्षक, उर्दू माध्यम शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. काशिनाथ पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,आम्ही शिक्षकांच्या समस्या, प्रश्न व प्रत्येक बाबतीत सोबत आहोत. माजी आमदार बाळाराम पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पालिका हद्दीतील शिक्षकांना महानगरपालिकेत 100% घ्यावे लागेल. शिक्षकांचे सर्व प्रश्न व समस्याबाबत आम्ही सोबत असल्याचे सांगितले. याकार्यक्रमाला गणेश पाटील माजी उपनगराध्यक्ष, राजेश केणी चिटणीस पनवेल तालुका, ज्ञानेश्वर मोरे सहचिटणीस पनवेल, साईनाथ पवार समाज कल्याण विभाग, प्रकाश म्हात्रे कामगार नेते, लक्ष्मण मोकल, हेमंत पाटील, मनिषा मोरे, दर्शन पाटील, रमेश मोकल, समाधान गावंड, जगदीश घरत खारघर, तेजस्वी घरत, पंचायत समिती पनवेलचे सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. ह्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य सल्लागार अविनाश म्हात्रे यांनी केले. तळोजे पाचनंद केंद्रातील शिक्षिकांनी आपल्या सुरेल आवाजात राज्यगीत, ईशस्तवन, स्वागतगीत व स्फुर्तीगीत सादर केले. सुत्रसंचालन महिला जिल्हा कोषाध्यक्षा सारिका पाटील ह्यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वसंत मोकल, विश्वास ठाकुर, सुनील देशमुख, विकास गायकवाड, श्वेता पाटील, पुष्पा मोकल, श्रीधर म्हात्रे, दत्तात्रेय भोंडकर, समिर धाडवे, नरेश पाटील, सुनील मोरे, जनार्दन गावंड, गुलाब गावंड, अनिल कदम, श्री.सतीश यादव, शंकर रेवे, संतोष चिकणे यांनी विशेष मेहनत घेतली.

पनवेल शहर पोलीस ठाण्यामार्फत परिसरात कोंबींग ऑपरेशन तसेच आल आऊट दरम्यान मोठी कारवाई

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर

पनवेल शहर पोलीस ठाण्यामार्फत परिसरात करण्यात आलेल्या कोंबींग ऑपरेशन तसेच आल आऊट दरम्यान मोठी कारवाई करण्यात आली आहे . पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 2,चे प्रशांत मोहिते, सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभाग अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे व त्यांच्या पथकाने पनवेल शहर हद्दीतील जय भारत नगर, खाडी किनारी झोपडपट्टी भागामध्ये तसेच पुष्पकनगर व पनवेल रेल्वे स्टेशन व एस.टी. स्टॅन्ड परिसरात कोंबींग ऑपरेशन तसेच आल आऊट मोहीम राबवत अमली पदार्थ सेवन करणाऱ्या तिघांविरुधात कारवाई करण्यात आली . तसेच देशी विदेशी दारू विक्री तिघांविरोधात गुन्हे दाखल केले . गर्दी मारामारीच्या गुन्हयातील 1 संशयीत आरोपीत ताब्यात घेतले, समन्स बजावणी करण्यात आली ,म.पो.का.कलम 110 अन्वये 1 अदखलपात्र गुन्हा दाखल काण्यात आले , हिस्ट्रीशिटर चीटर दोघांना ताब्यात घेण्यात आले नाकाबंदी दरम्यान 182 वाहने तपासणी करण्यात आली असून 39 वाहनांवर कारवाई करण्यात आली. 3 संशईत बांग्लादेशी इसम चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले आहे . अश्या प्रकारच्या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत .

मोटारसायकलस्वाराचा अपघातात दुर्देवी मृत्यू

दैनिक युवक आधार
पनवेल (वार्ताहर): पनवेल तालुक्यातील मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणेलेन किमी 2/400 या ठिकाणी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वाराचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे . बजाज कंपनीची पल्सर मो. सा.क्र.MH 06 AV 4114 या वरील चालक नामे आतिष चंद्रकांत पाटील वय 32 वर्ष रा.कसलखंड हे आपल्या ताब्यातील मोटार सायकलर घेऊन मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर प्रवेश निषेध असतांना लावण्यात आलेले बोर्डाकडे दुर्लक्ष करून मोटरसायकल स्वार हा कळंबोली ते कसलखंड असे जात असताना मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणेलेन KM 02/400 या ठिकाणी आले असता त्यांच्या समोर जाणाऱ्या ट्रेलरला पाठीमागून जोरात ठोकर मारून झालेल्या अपघात त्यांचा मृत्यू झाला आहे . या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

राज्यस्तरीय लगोरी स्पर्धेमध्ये नाशिक संघाला तृतीय क्रमांक

(क्रीडा सह्याद्रीच्या खेळाडूंची नेत्रदीपक कामगिरी)

दैनिक युवक आधार
उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक
विनोद गायकवाड । नाशिक : महाराष्ट्र लगोरी असोसिएशन व पुणे जिल्हा लगोरी असोसिएशन आयोजित ९ वि ज्युनियर लगोरी राज्य अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी वरवंड (पुणे) येथील नागनाथ माध्यमिक विद्यालय,वरवंड येथे उत्साह संपन्न झाली यामध्ये नाशिक संघाने सहभाग नोंदवून मुला व मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांचे जिल्ह्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी अणिकेत सुनील तटकरे – मुख्य संयोजक, माजी आमदार, अध्यक्ष - महाराष्ट्र लगोरी असोसिएशन, तुषार व्ही. एम. जाधव – सदस्य, राहुल दादा दिवेकर – संचालक, पुणे जिल्हा दूध उत्पादक संघ,संजय भाऊ जाधव – उद्योजक,दत्तात्रय दिवेकर – सरपंच, वरवंड,प्रदीप दिवेकर – उपसरपंच, वरवंड,चवळे साहेब – तालुका क्रीडा अधिकारी,डॉ. विजय दिवेकर – VGSS, महाराष्ट्रातील जिल्हा सचिव पंच व क्रीडा शिक्षक क्रीडा मार्गदर्शक उपस्थित होते या स्पर्धेसाठी एकूण १५ संघाने सहभाग नोंदवला होता.नाशिक संघ कर्णधार , सुमेध दिलीप बोदडे,दक्ष गायकवाड,आदित्य वाघ,नयन शर्मा ,अवनीश कुंदे,वेदांत कुंदे व, महिला कर्णधार करुणा शिंदे,आराध्या सालमुठे, श्रद्धा मोगल, वेदिका कुशारे, अनुष्का कुशारे, कृतिका मोगल, मोक्षदा जाधव, तमन्ना तांबोळी आणि करिष्मा तांबोळी यांनी उत्कृष्ट खेळ करत नाशिक संघाला तृतीय क्रमांक मिळवून , दिल्याबद्दल महाराष्ट्र लगोरी असोसिएशनचे अध्यक्ष आ. अनिकेत तटकरे ,नाशिक जिल्हा लगोरी संघटक व क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड, महाराष्ट्र असोसिएशनचे सदस्य तुषार जाधव , राजेंद्र पाटील,क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे ,सदस्य विनोद गायकवाड, चेतन कुंदे,दत्तू रायते

,रमेश वडघुले ,प्रतीक्षा कोटकर ,विजय घोटेकर , कीर्ती कोटकर, श्याम चौधरी यांनी सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या . क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

राज्यातील सर्व शाळा सीसीटीव्ही च्या नजरेत

आठवडाभरात निर्णय जारी करण्याचे उच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी : नवीन शैक्षणिक वर्ष सुरू व्हायच्या अगोदर राज्यातील सर्व शाळात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येतील. शाळकरी मुलांची सुरक्षितता निश्चित करणारा शासनाचा हा निर्णय पुढील एका आठवड्यात काढा, असे आदेश उच्च

न्यायालयाने बुधवारी राज्य सरकारला दिले. तसेच शासन निर्णयाच्या या अंमलबजावणीसाठी दोन महिन्यांची मुदतही दिली.

दिवसेंदिवस वाढणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटना, शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न याकरता दोन निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती न्यायालयाने स्थापन केली होती. या समितीने फेब्रुवारी महिन्यात शिफारशीचा अहवाल न्यायालयाला सादर केला होता. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती निला गोखले यांच्या खंडपीठापुढे बुधवारी या प्रकरणी सुनावणी झाली, त्यावेळी समितीच्या शिफारशी आणि पूर्वीच्या शासन निर्णयाच्या आधारे एकत्रित शासन निर्णय लवकरच काढण्यात येईल व पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शासनाच्या निर्णयानुसार शाळांना पुरेसा वेळ मिळण्यासाठी शासन निर्णय लवकरात लवकर काढण्यात येईल ,असे अतिरिक्त सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी न्यायालयाला सांगितले याची दखल घेऊन हा शासन निर्णय एक आठवड्याच्या हात काढण्याच्या आदेश खंडपीठाने सरकारला दिले.

टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू; दोघे जखमी

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर) : पत्नी व मेहुणीसह जाणाऱ्या तरुणाच्या दुचाकीला भरधाव टँकरने धडक दिली. या अपघातात दुचाकी चालवणाऱ्या तरुणाचा मृत्यू; तर त्याची पत्नी व मेहुणी या दोघी गंभीर जखमी झाल्याची घटना सायन-पनवेल मार्गावरील कळंबोली येथील पुलावर घडली. मृत तरुणाचे नाव प्रदीप चंद्रकांत कांबळे (३२) असे असून जखमी झालेल्या त्याच्या पत्नीचे नाव अंजली कांबळे (२६); तर मेहुणीचे नाव ज्योती गिरजू किर्वे (२४) असे आहे. प्रदीप हा बदलापूर येथील शिरगावात; तर त्याची मेहुणी ज्योती कामोठेमध्ये राहण्यास आहे. प्रदीप बुधवारी कामानिमित्त पत्नीसह खारघर येथे आला होता; तर त्याची मेहुणी ज्योतीदेखील आली होती. सायंकाळी प्रदीप व त्याची पत्नी अंजली हे दोघेही ज्योतीला कामोठे येथील घरी सोडण्यासाठी निघाले होते. प्रदीप दुचाकीवरून पत्नी व मेहुणीला घेऊन खारघर येथून कामोठे येथे जात होता. दरम्यान, ते सायन-पनवेल मार्गावरील तळोजा फाटा येथील उड्डाणपुलावर आले असता पाठीमागून येणाऱ्या भरधाव टँकरची त्यांच्या दुचाकीला धडक लागली. यात प्रदीपचा जागीच मृत्यू झाला; तर त्याची पत्नी व मेहुणी गंभीर जखमी झाल्या आहेत.

खालापूर तहसील कार्यालयाचे ध्वजारोहण आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते...

अभिमान व अस्मितेच्या भावनेतून विविध विधायक कार्यातून महाराष्ट्र दिन साजरा..आ.विक्रांत पाटील

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर
1मे महाराष्ट्र दिन ६६ वा वर्धापन दिनाच्या खालापूर तालुक्यातील ध्वजारोहणाचा मान आमदार विक्रांत पाटील यांना मिळाला . दिवस भर विविध विधायक कार्यातून कामगार दिन व महाराष्ट्रातील WAVES 2025 च्या माध्यमातून पंतप्रधान राष्ट्र सेवक नरेंद्र मोदीजी यांच्या कार्याचा माहिती देऊन तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या नेतृत्वाखाली देशात सर्वात बळकट राज्य होण्यासाठी आपण साऱ्यांनी एकसंघ होऊन राष्ट्र निर्माण कार्यातील महाराष्ट्राचे महत्त्व जगाला दाखवूया अश्या भावनेतून संस्कृती ,कला,राष्ट्रीय धोरण, रोजगार ,शिक्षण

अश्या विविध विषयांवर अभ्यासू भाषणे केली. व मोदी सरकार मध्ये देवेंद्र जी च्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सदैव 1 नंबर असेल असा विश्वास व्यक्त केला. स्वतंत्र मराठी भाषीक राज्य व्हावे म्हणून आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व स्वातंत्र सेनानी यांना आपल्या जनसेवा कार्यालयाच्या ठिकाणी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सामूहिक मानवंदना देण्यात आली.समाधीन निर्मित मराठी पाऊल पडते पुढे मराठी संस्कृतीचा सुंदर संगीतमय सांगीतिक जागर पनवेलकरांना अनुभवायला मिळाला . यावेळी लोकसेवेच्या भावनेतून जन जागृती करणाऱ्या सेवक, तसेच विविध क्षेत्रात नामलौकीक मिळवणारे व्यक्तींचा सन्मानचिन्ह ,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कामगार दिनाच्या निमित्ताने युवकांनी येणाऱ्या नोकरी उद्योगधंद्याच्या कडे पाहताना आपल्यातील नाविन्यपूर्ण तांत्रिक कलेला सरकारच्या शैक्षणिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून पात्र केले पाहिजे ,ज्याने युवकांना रोजगार कामगार धोरण देताना सरकारला आपल्यासाठी योग्य निर्णय घेण्यात अडचणीचा जाणार नाही .महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी एकसंघ एक दिलाने मराठी धर्म माणूस म्हणून कार्य करू सर्वांना सोबत घेऊ आज या निमित्ताने असा संकल्प करून महाराष्ट्र दिन साजरा करूया असे बोलून सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मराठी पाऊल पडते पुढे मराठी संस्कृतीचा सांगीतिक जागर कार्यक्रमात भाजप ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे सहकारी मित्र परिवारांचे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा देऊन सन्मान ,सत्कार करून आभार मानले. या कार्यक्रमात पनवेलकरांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून महाराष्ट्र दिन जल्लोषात साजरा केला

विठ्ठलवाडीत जलपर्णी हटवताना तहसिलदार बालपणात हरवले !

चिंचेच्या झाडाखाली आठवणींची सावली

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे । निफाड :- चांदोरी ता.निफाड येथील विठ्ठलवाडी परिसरात गोदावरी नदी जलपर्णीच्या अतिक्रमणामुळे संथ झाली आहे. परिणामी, परिसरातील जलनिचरा व जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत आहे. या व आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने यंत्रसामग्रीच्या सहाय्याने जलपर्णी हटवण्याची मोहीम हाती घेतली. मात्र, या शासकीय मोहिमेदरम्यान एक अनपेक्षित भावनिक क्षण घडला. तहसिलदार विशाल नाईकवाडे एका विलायती चिंचेच्या झाडासमोर थांबले आणि आठवणींच्या सावलीत हरवून गेले.

नदी मोकळी झालीच पाहिजे, पण अशी झाडं आणि त्यांच्याशी जोडलेल्या आठवणीही जपल्या पाहिजेत. कारण ही झाडं केवळ निसर्गाचं प्रतीक नाहीत, तर आपल्या संस्कृतीचा आणि आठवणींचा भाग आहेत. झाडं म्हणजे निसर्गाची देणगीच नाहीत, तर आपल्या संस्कृतीचा भाग आहेत.

सागर आहेर
स्थानिक

झाड...आठवणी आणि हरवलेलं बालपण...

जलपर्णी हटवण्याच्या कारवाईचा आढावा घेत असताना तहसिलदार नाईकवाडे यांच्या नजरेस जुनं, रेखीव पसरलेलं विलायती चिंचेचं झाड पडलं. काही क्षण ते तिथंच थबकले. "विलायती चिंचा आहेत..." असं हळूच पुटपुटत ते त्या झाडाकडे एकटक पाहू लागले. चेहऱ्यावर हसू उमटलं, आणि डोळ्यांत आठवणींचं पाणी चमकलं.

"लहानपणी आम्ही मित्रांबरोबर आकडी घेऊन चिंचेच्या झाडावर दगड मारायचो. चिंचा पडल्या की वाटून खायचो. कुणी जास्त खाल्ल्या की भांडणं व्हायची... आणि काही मिनिटांतच पुन्हा सगळं विसरून हसत बसायचो. किती निरागस काळ होता तो!" नाईकवाडेंनी आठवणींमध्ये रंगून जात सांगितलं. त्यांच्याजवळ उभा असलेला एक सहकारी भावुक होत म्हणाला, "सर, खरंच तिथूनच तर आमचं बालपण सुरू झालं होतं!"

मशिनांचा आवाज विरघळला आठवणींच्या कुजबुजीत

त्याक्षणी परिसरात क्षणभर शांतता पसरली. यंत्रांची घरघर, बोटींमधून काढली जाणारी जलपर्णी याच्या गोंगाटातही चिंचेस झाडाखाली उभं राहिलेलं बालपण अधिक स्पष्ट जाणवत होतं. या मोहिमेचं स्वरूप फक्त सरकारी कारवाईपुरतं मर्यादित राहिलं नाही, तर ती एक स्मृतींची भेट ठरली.

नदी मोकळी होणार आणि मनही हलकं

प्रशासनाच्या या उपक्रमामुळे गोदावरीचा प्रवाह पूर्ववत करण्यासाठी मदत मिळणार आहे. जलपर्णीमुक्त झालेली नदी म्हणजे परिसराच्या नवजीवनाची सुरुवात असणार आहे. मात्र या मोहिमेने तहसीलदारांच्या आठवणींना नवसंजीवनी दिली, आणि त्या झाडाखाली क्षणभर उभं राहून सर्वांनी एक भावनिक प्रवास अनुभवला.प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नदी पुन्हा मोकळी होणार आहे, याचा स्थानिकांना आनंद आहेच. पण या मोहिमेदरम्यान चिंचेचे झाड पाहून चिंचेच्या आठवणींनी मनात लहानपण डोकावलं. झाडं म्हणजे केवळ निसर्ग नाही, तर आठवणींचं जिवंत प्रतीक आहेत. चिंचेचं झाड फक्त झाडच नाही तर ते काळाची साक्ष आहे. झाडं ही केवळ निसर्गाची देणगी नसून, ती अनेकांच्या आयुष्याची आठवण, एक जिवंत इतिहास असते. चिंचेसारखी झाडं केवळ सावली देत नाहीत, ती आपलं भूतकाळ जपतात. ती माणसांची, आठवणींची, नात्यांची साक्षीदार असतात.

विशाल नाईकवाडे, तहसीलदार, निफाड

एसटी डेपो नांदेड आगार येथे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा

दैनिक युवक आधार
नांदेड वार्ताहर
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.1 मे 2025 गुरूवार रोजी सकाळी ठिक 7 वाजता महाराष्ट्र राज्य स्थापनेचा 65 वा वर्धापन दिन व 101 वा जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री.अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात येवून राष्ट्र ध्वजास मानवंदना देण्यात आली. राष्ट्रगीतानंतर लगेचच एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी सामुहिकरित्या राज्यगित घेतले.

यावेळी आगार व्यवस्थापक मा.श्री.अनिकेत बल्लाळ यांनी आपले मनोगत व्यक्त करून महाराष्ट्र स्थापना दिन व जागतिक कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, लेखाकार सतिश गुंजकर, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, नितीन मांजरमकर, माधव तोडे, गुलाम रब्बानी, सौ.शिल्पा ढवळे, मनिषा कदम, योगेश्वरी सुवर्णकार, वाहतुक नियंत्रक सुनिल मोरे, पाळी प्रमुख कैलास वाघमारे, सुरक्षा रक्षक आनंद राठोड, गंगाधर वटाने, पवन पाटोळे, पांडूरंग बुरकुले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन संतोष ढोले यांनी मांडले. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार-कर्मचारी, बंधु-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उरण जे एन पी ए मार्ग वाहन मुक्त आणि अपघात मुक्त ठेवा : पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांचा आदेश

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी: वाहतूक जनजागृती म्हणजे लोकांना वाहतूक नियमांबद्दल जागृत करणे,वाहतूक सुरक्षा वाढवणे, आणि अपघातांची संख्या कमी करणे अशा या वाहतूक नियमांचे पालन केल्याने रस्ते मोकळे राहतात ,वाहतूक कोंडी कमी होते, वाहतूक कोंडी कमी झाले की प्रदूषण कमी होते, ज्यामुळे पर्यावरणास मदत होते.

उरण तालुका अपघात निवारण समिती ची मंगळवार दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता बंदर कामगार वसाहती मधील अधिकारी क्लब मध्ये जे. एन. पी. ए. उरण मार्गावरील रस्ते अपघात, वाहतूक कोंडी इत्यादी विषयांवर महत्त्वपूर्ण मीटिंग वाहतूक विभागाचे माननीय पोलीस उपायुक्त श्री तिरुपती काकडे ,माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विठ्ठल कुबडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. वाहतुकीला अडथळा आणि अपघाताला निमंत्रण देणारी जड वाहने तसेच खड्डे मुक्त मार्ग ठेवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.अन्यथा अशा वाहनांवर कारवाई करण्यात येईल. असे आदेश जेएनपीए बंदर आणि उरणच्या मार्गावरील वाढत्या दिवसेंदिवस वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी झालेल्या बैठकीत नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दिले.

जे एन पी ए बंदरावर आधारित गोदाम, सीएफएस, तसेच वाहतूकदार या व्यवसायांवर अवलंबून असलेल्या आस्थापनाचे तसेच एन.एच. आय. व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांनी या अपघात संदर्भात विविध मुद्दे मांडून अपघाताला कारणीभूत ठरणाऱ्या विरोधात कारवाई आणि समन्वयाची मागणी केली. वाहतूक विभागाचे अतुल दहिफळे, जी.एम. मुजावर, नितीन बडगुजर, तर जेएनपीएचे कामगार विश्वस्त दिनेश पाटील, रवींद्र पाटील ,सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पाटील, प्रमोद ठाकूर, संदेश ठाकूर , राजेंद्र मढवी,आदी उपस्थित होते.

यावेळी काकडे यांनी उरण आणि जे.एन.पी.ए.बंदर परिसरातील रस्ते खड्डे मुक्त आणि वाहन मुक्त रहावे यासाठी वाहतूक विभागाने ३ अधिकारी व १५ जादा अंमलदारांची नेमणूक केली आहे. तर वाहतूक आणि गोदाम मालकांनी आवश्यक त्या वेळेत वाहने मागवावी. विनाकारण वाहने रस्त्यावर उभी केल्यास अशा वाहनांवर कारवाई करण्यात येईल .या अनुषंगाने उपाय योजना लागू करा, अन्यथा कारवाई केली जाईल. तसेच अपघात होऊ नये यासाठी प्रत्येकाने सहकार्य करावे. कोणत्याही मार्गावर कंटेनर वाहन बंद पडल्यास त्वरित हटवण्यात यावे, वाहतूक कोंडी उरण ,न्हावा शेवा आणि गव्हाण फाटा या तिन्ही वाहतुकीला अडथळा येत असेल तर ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा.असे आव्हान करण्यात आले. वाहतूकदारांनी जड वाहने डाव्या बाजूने चालवावी, वहातुक नियमांचे पालन करण्यात यावे,हेलमेट,लेन मध्ये चालण्यासाठी सुचना, तसेच वाहतूक विभागाने लेन कटिंग केसेस कराव्यात, चालकाने आणि नियम न पाळल्यास कारवाई करणार, तसेच मार्गावरील दिशादर्शक फलक, वेगाने वाहने हाकणाऱ्यांवर कारवाई ,मार्गावरील खड्डे दुरुस्ती करण्याची मागणी, एन एच आय एम. एस.आर .डी .सी .पट्टे आखून घ्यावेत, पुलावर ओव्हरटेक करू नये, दास्तांन, धुतुम येथील अवैध वाहन तळ, जेएनपीएने आवश्यकतेनुसार वाहनेच मार्गावर आली पाहिजे. क्षमतेच्या अधिक वाहने येऊ नये, त्याची दक्षता घ्यावी. इमर्जन्सी वाहनांना अडथळा नाही. जे.एन.पी.ए. येथे सर्व मार्गावरील गुगल मॅपिंग केले जात आहे. सी.एफ.एस.एम. टी यार्ड गोडाऊन यांनी शिपाई नेमण्यात यावे. अशा सूचना अनावश्यक गतिरोधक हटवण्यात यावे, उड्डाण पुलावर संकेत दिवे बसवण्यात यावे, गोडाऊनच्या बाहेरील मार्गावर वाहने उभी राहणार नाहीत याची काळजी घ्यावी, संदेश देणाऱ्या चार वाहतूक पोलीस वाहनांचा वापर करण्यात यावा. उरण शहर परिसरात वाहतूक नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. याकरता दर दोन महिन्यांनी बैठक घेण्यात येणार आहे .

जे एन पी ए किंवा उरण परिसरातील मार्गावरील वाहतूक कोंडी ,उभी वाहने ,खड्डे याची माहिती वाहतूक विभागाला देण्यासाठी वाहतूक विभागाने ८६५५३५४१३६ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा तसेच याच नंबरवर फोटो पाठवण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

श्री वरदविनायक हरीनाम सप्ताह मंडळ बोकडवीरा यांच्या वतीने अखंडहरीनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील : संसारशून्य दिशाहीन वाटचाल करणाऱ्या स्माज्यास अंधकारांतून मोक्षाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे भगवंताचे स्मरण याकरिता बोकडवीरा गावचे ब्रम्हमूर्ती वामनबाबा यांच्या कृपाप्रसादाने वै.सद्गुरू अनंत महाराज पारगावकर,श्रीमत परमहंस जीवनमुक्त स्वामी महाराज नामवै. सद्गुरू लक्ष्मण महाराज,वै.गोपाळ काका महाराज ,वै.गोपाळ बाबा महाराज वहाळकर,वै. हसुराम बाबा महाराज,वै.नागाबाबा महाराज वै.सद्गुरू नारायण बाबा गडबकर.गुरुवर्य ह.भ.प.विष्णू महाराज गुरुवर्य ह.भ.प.गोविंद महाराज घरत. या सरणाच्या आशीर वादाने उरण बोकडवीरा येथे दि.26 ते 30 एप्रिल 2025 रोजी श्री वरदविनायक हरीनाम सप्ताह मंडळ बोकडवीरा.व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याची आज दि .30 एप्रिल 2025 रोजी काल्याच्या कीर्तनाने मोठया उत्साहात सांगता करण्यात आली.दैनंदिन प्रवचन,हरिपाठ,कीर्तन असहा सोहळा संपन्न झाला.दैनंदिन प्रवचनां साठी ह.भ.प नितीन महाराज म्हात्रे,ह.भ.प.राजेंद्र महाराज पाटील,ह.भ.प. भिकाजी महाराज नाईक,29 तारखेस ज्ञानेश्वरी पूजन व दिंडी प्रदक्षिणातर दि 30 रोजी हरिपाठ रात्रोह.भ.प. वैष्णवीताई खडतकर,ह.भ.प.अनिल महाराज महाकाळे,ह.भ.प.विश्वनाथ वारिंगे,ह.भ.प.शारदाताई सूर्यवंशी ,ह.भ.प.परमेश्वर महाराज जायभायेआदींनी आपल्या कीर्तनामधून समाज प्रबोधनाचे कार्य केले.ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष सुर्यकांत पाटील व उपस्थित पाहुणे यांच्या हस्ते दीप पूजन करण्यात आले या सोहळ्या प्रसंगी दीपोत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात आला या वेळी मंडळाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

सदरचाहरीनाम सप्ताह यशस्वी करण्या साठी मंडळाचे संस्थापकह.भ.प.गणेश सोम ठाकूर,अध्यक्ष ह.भ.प राजेश धनंजय पाटील.कार्याध्यक्ष वसंत धनाजी पाटील.सेक्रेटरी खंडेश्वर एकनाथ पाटील.खजिनदार धीरज अनंत पाटील,उपाध्यक्ष यशवंत गजानन पाटील,उपाध्यक्ष रघुनाथ जगनाथ पाटील,सह सेक्रेटरी गणेश रामचंद्र पाटील, भूषण रमाकांत पाटील, नीलकमल नामदेव भोईर, प्रभाकर बाळकृष्ण पाटील,शरद नमाजी पाटील,ह.भ.प.नरेंद्र वसंत पाटील.प्रग रामदास पाटील हे सारे संचालक मंडळ यांच्या समवेत ग्राम पंचायत बोकडवीरा,श्री गणपती देवस्थान बोकड व ग्राम सुधारणा मंडळाचे सर्व पदाधिकारी,ग्रामस्थ देणगीदार यांचे विशेष सहकार्य लाभले या अखंड हरीनाम सप्ताहाचाव महाप्रसादाचा लाभ ग्रामस्थान बरोबरच पंचक्रोशिंतील स्न्स्त भाविकांनी घेतला.

उरण सावरखार गावचे सुपुत्र हरेश्वर जनार्दन ठाकूर कास्यपदकाने सन्मानित

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील : उरण तालुक्यातील सावरखार येथे राहणारे नागरी संरक्षण दलाचे मानसेवी अधिकारी हरेश्वर जनार्दन ठाकूर यांना महानिदेशालय, गृहमंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्यातर्फे BRONZE DISK{ कांस्य डिस्क} देऊन गौरव करण्यात आला.त्यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे उत्तम काम केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे. 1 मे 2025 रोजी महाराष्ट्र दिन व् कामगार दिनाच्या दिवशी उरण तहसील कार्यालयात उरण विधानसभा मतदार संघ आमदार महेश बालदी यांनी हरेश्वर जनार्दन ठाकूर यांचे अभिनंदन केले, या वेळी उपजिल्हाधिकारी भूसंपादन मेट्रो सेंटर जनार्दन कासार,उरण तहसीलदार डॉ .उद्धव कदम ,उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ ,उरण नगरपरिषद मुख्याधिकारी समीर जाधव व मान्यवर उपस्थित होते.

हरेश्वर जनार्दन ठाकूर यांनी त्यांच्या नागरिक संरक्षण दल येथे 18 वर्षे पूर्ण झाली आहेत .यांच्या या कालावधीमध्ये त्यांनी अनेक स्थानिककामे केली त्या बद्दल त्यांचे . राज्यस्तरीय संपूर्ण पाठ्यक्रम व त्यांची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली होती. रायगड जिल्ह्यामध्ये कार्यरत करत असताना अनेक ठिकाणी प्रशिक्षण देण्यासाठी त्यांची निवड झाली आहे प्रशिक्षण देता देता जेव्हा जेव्हा आपत्कालीन सारखी परिस्थिती येते त्या त्यावेळी त्या ठिकाणी जाऊन मदत कार्य करणे हे प्रथम प्राधान्य त्या ठिकाणी हजर राहतात, सावित्री नदी महाड येथील दुर्घटनेमध्ये, व्हेल मासा रेवदंडा अलिबाग, चित्रा आणि खलिजांबोटीचे समुद्रामध्ये झालेले टक्कर आणि अशा या रासायनिक आपत्तीमध्ये कार्य केले आहे, दरड कोसळणे पूर सारखे परिस्थिती येणे पावसाची हवामानामध्ये आपत्तीमध्ये प्रतिसाद देणे, इर्शालवाडी मध्ये जखमी तसेच मृत व्यक्तींना ढीगारांमधून बाहेर काढणे अशी अनके कार्य हरेश्वर ह्यांनी केले आहेत, ह्या सर्वांची नोंद घेऊन, मान्सून मधे अतिवृष्टी मुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये अत्यंत सचिवतीने व तत्परतेने शोध व बचाव कार्य सुरू केले, नैसर्गिक आघाताने बाधित झालेल्या बांधवांना तात्काळ मदत मिळवून दिली, शिवराज्याभिषेक सोहळा रायगड किल्ले, शासन आपल्या दारी, पंतप्रधान दौरा आणि भूमिपूजन सोहळा अशा महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये त्यांनी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने प्रशंसनीय भूमिका बजावली होती त्याची दखल शासनाने घेतली आणि मा. आदितीताई तटकरे,मा. जिल्हाधिकारी रायगड जिल्हा यांच्या उपस्थित 15 ऑगस्ट 2024 रोजी विशेष पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.होते

महाशिवरात्री बंदोबस्त घारापुरी एलिफंटा जेएनपीटी बंदर, मोरा बंदर, निवडणूक कर्तव्य कार्य, गणपती विसर्जन कर्तव्य नवरात्री विसर्जन कर्तव्य, माननीय जिल्हाधिकारी रायगड जिल्हा यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात शासकीय कार्यालय अधिकारी महाविद्यालय औद्योगिक कंपनी पोलीस वर्ग इ प्रशिक्षण देण्यासाठी निवड करण्यात आली, कोरोना संसर्गजन्य आपत्तीमध्ये माननीय तहसीलदार साहेब यांच्या आदेशानुसार अन्नधान्य वाटप करणे, लसीकरण साठी आरोग्य खात्याला मदत करणे इ. महत्वाचे कामे पार पाडले.या सर्वांचे दखल घेत महानिदेशालय, गृहमंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्यातर्फे BRONZE DISK{ कांस्य डिस्क} देऊन1 मे 2025 रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून त्यांचा गौरव करण्यात आला.

कोकण कन्या सृष्टी कुळ्ये चे 'यूपीएससी'त यश

दैनिक युवक आधार
कोकण (शांताराम गुडेकर): सृष्टी कुळ्ये ही मूळची रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामधील शिरवली (पलीकडचीवाडी)येथील राहणारी,सध्या ती मुंबईत राहते.तिचे वडील सुरेश कुळ्ये हे मुंबईत एका प्रिंटिंग प्रेसमध्ये मशीन ऑपरेटर म्हणून काम करतात,तर आई गृहिणी आहे. सृष्टी हिला दोन भावंडे असून,ती या सर्वात मोठी आहे.घरची परिस्थिती बेताची आहे, तरीही सृष्टी हिने केवळ जिद्द, चिकाटी आणि प्रचंड मेहनत या त्रिसूत्रीच्या जोरावर सृष्टी हिने यूपीएससीमध्ये यश संपादन करत देशात ८३१ रँक मिळवली.

लेकीने (सृष्टी) मिळविलेल्या यशानंतर आई-वडिलांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कु.सृष्टी कुळये हिचे तिच्या मानखुर्द येथे राहत्या घरी जाऊन लांजा तालुक्यातील भांबेड गावातील श्री वाघजाई तरुण विकास मंडळ-नार्डेकरवाडी यांच्याकडून पुष्पगुछ,शाल आणि भारताचे संविधान देऊन सत्कार करण्यात आला. तसेच तिच्याशी आणि तिच्या परिवाराशी सुसंवाद साधण्यात आला.तिच्या UPSC स्पर्धा परीक्षेबद्दलचा प्रवास, तिने केलेली मेहनत इ.गोष्टीची माहिती घेऊन उपस्थित सभासदांनी तिला मंडळातर्फे अभिनंदन आणि शुभेच्छा व्यक्त केल्या.हा कार्यक्रम श्री. संतोष नार्डेकर यांच्या माध्यमातून पार पडला.त्यामुळे मंडळतर्फे आणि उपस्थित सभासद यांचे यानिमित्ताने आभार व्यक्त करण्यात आले.श्री वाघजाई माता तिला यश, कीर्ती आणि दीर्घ आयुष्य देवो हीच प्रार्थनाही या सत्कार दरम्यान करण्यात आली.

सध्या सृष्टी मुंबईतील मानखुर्द शिवनेरीनगर येथील झोपडपट्टीत राहत असल्याने या ठिकाणी तिचा अभ्यास होत नव्हता. त्यामुळे तिने सन २०२२ मध्ये गोवंडी येथील एम.पॉवर लायब्ररीत प्रवेश घेतला. घरात कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक वातावरण नाही.घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे कोणतीही शिकवणी नाही. अशा परिस्थितीतही सृष्टी हिने केवळ इच्छाशक्ती आणि अभ्यासाच्या जोरावर गरुडझेप घेतली. तिने मिळविलेल्या या यशानंतर शिरवली युवक मंडळ आणि कुळ्ये परिवारातर्फेही तिचा सत्कार करण्यात आला.

लांजा तालुक्यातील भांबेड गावातील नार्डेकर वाडी श्री वाघजाई तरुण विकास मंडळ मुंबईचे श्री.संतोष नार्डेकर,पांडुरंग दैत , सुनील नार्डेकर,यशवंत जाधव, पंढरीनाथ शिगम,मनोहर दैत, राजाराम दैत,नरेश दैत, नागेश नार्डेकर, अनिल नार्डेकर आणि सिध्दी नार्डेकर तसेच अन्य पदाधिकारी आणि वाडकरी उपस्थित होते.

घरच्या परिस्थितीची कल्पना होती. आई-वडिलांचे कष्ट पाहत होते. त्यामुळे चांगले शिकायचे आणि मोठे व्हायचे हे मनाशी ठरविले होते.त्यासाठी आई- वडील, माझे मार्गदर्शक शिक्षक, मला प्रोत्साहन देणारे हितचिंतक यांचे पाठबळ मिळाले. या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे मी हे यश मिळवू शकले असे सृष्टी कुळ्ये यांनी सत्कारला उत्तर देताना स्पष्ट केले. या यशा बद्दल लांजा तालुका मधील अनेक मंडळ, समाज शाखा यांच्या तर्फे सृष्टी यांना अनेकांकडून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

लॉजिस्टिकमुळे अनेक किलोमीटरची प्रचंड मोठी वाहतूक कोंडी, ट्रेलर भर रस्त्यावर पार्किंग केल्याने वाहतुकीस अडथळे

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
कोन -सोमटणे ते नारपोलीपर्यंत अनेक ट्रक, ट्रेलर कंटेनर लॉजिस्टिक गोडाऊन आहेत. हा मुख्य रस्ता अनेक गाव खेड्यांना व औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांकडे जाणारा आहे. या रस्त्यावर नेहमी वाहतूक कोंडीची समस्या पाहायला मिळते. लॉजिस्टिक व्यवस्थापन व त्यांचे ट्रान्सपोर्टर ट्रक वाहक यांचा बेजबाबदारपणा याला कारणीभूत असतो. 1 मे महाराष्ट्र दिन रोजी या रस्त्यावर शेकडो ट्रक रस्त्यावरच अनेक किलोमीटरची वाहतूक कोंडी करून बिनधास्तपणे उभे होते. पोलीस वाहतूक नियंत्रण कायद्याची कुठलीही भीती व अंकुश नाही असे प्रकार नेहमी होत असल्याने वाहतूक नियमांची पायमल्ली करणाऱ्यामागे कोणाच वरदहस्त आहे का असा प्रश्न मनात निर्माण होतो. रस्ते, सुरक्षा वाहतूक नियमाचे उल्लंघन होत असताना ही वाहतूक नियंत्रण विभाग मात्र नेहमी बघ्याच्या भूमीकेत असतात. परिणामी रस्त्यावरून वाहतूक करणाऱ्या लाखो प्रवासी वाहतूक करणाऱ्या लोकांसाठी मात्र असुरक्षित अशी जीवघेणी परिस्थिती निर्माण होते. अश्या वेळी अनेक तास वाहतूक कोंडीला सर्वसामान्य जनतेला नाइलाजास्तव तोंड द्यावे लागत असून बेजबाबदारपणे वागत असलेले लॉजिस्टिक व्यवस्थापनाला कायद्याची कुठलीही भीती दिसत नाही. या वाहतूक कोंडीची माहिती सामाजिक कार्यकर्ते साधी शेख यांनी वाहतूक विभागाला दिल्यानंतर नवीन पनवेल (पळस्पे) वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक सूरज पाटील यांच्या आदेशानुसार पोलीस हवालदार संजय जाधव, राकेश भोईर, सुमित सरगर यांनी बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या ट्रक वाहनांवर दंडात्मक कारवाई केली .मात्र मुळ वाहतूक कोंडीस जबाबदार असलेल्या लॉजिस्टिक व्यवस्थापनावर कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही. त्यामुळे येथे वारंवार होणारी वाहतूक कोंडी, रस्ते असुरक्षितता कायमस्वरूपी संपेल का याकडे सर्व सामान्य जनता लक्ष ठेवून आहे.

किन्हीराजा आठवडी बाजारामध्ये वरली मटका सुसाट...

ठाणेदार साहेब हा घ्या पुरावा... तुमचेच कर्मचारी तुम्हालाच फसवत असल्याचा...

वाशिम :- ज ऊ ळ का पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या किन्ही राजा बिट मध्ये पोलिस कर्मचारी यांना पोलीस चौकी उघडण्याची एलर्जी असून चौकी पासून जवळच असलेल्या आठवडी बाजारामध्ये खुले आम वरली मटका व्यवसाय चांगलाच सुसाट चालु असून मात्र किन्ही राजा बिट चे कर्मचारी हे पोलीस स्टेशन लाभलेले कर्तव्य दक्ष ठाणेदार अपीआय हिवरकर यांच्या डोळ्यात धूळफेक करीत सर्व अवैध व्यवसाय बंद असल्याचे भासविण्यात येत असून किन्ही राजा बिट मध्ये फेरफटका मारला असता सर्व अवैध व्यवसाय हे सुसाट चालु असल्याचे दिसून येत आहेत. गेल्या काही वर्षापासून किन्ही राजा येथील तरुणाईमध्ये वाढत असलेल्या कमी गुंतवणुक करुन जास्त नफा कमावण्याच्या मानसिकतेमुळे अवैध धंद्याकडे अनेक तरूणांचा कल वाढला आहे. त्याचाच फायदा घेत किन्ही राजा अवैध धंद्यात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसत आहे. अशा धंद्याकडे तरूणांचा वाढलेला कल आणि पोलिस विभागाकडून त्याकडे करण्यात येणारे दुर्लक्ष यामुळे अवैध धंद्यांना जणु मोकळे रानच मिळाले आहे. गावातील विविध भागात सुरू असलेल्या या अवैध धंद्यांमुळे आता गावातील अवैध धंद्यांना किन्ही राजा बिट पोलिसांनी जणूकाही 'एनओसी'च दिली की काय, असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये उपस्थित केल्या जात आहे. आता कमी गुंतवणुकीत जादा नफा कमावण्याच्या नादात दारूविक्री, सट्टा पट्टी, जुगार, मटका, अवैध पेट्रोल साठवणूक,अशा अवैध धंद्याकडे त्यांचा कल वळल्याचे दिसून येत आहे. पान ठेला किंवा चहा टपरीच्या माध्यमातून दहा वर्षांत जेवढा पैसा कमावता येणार नाही, तेवढा पैसा अवैध धंद्यात केवळ दोन ते तीन वर्षांत कमावता येतो असा त्यांचा समज आहे. त्यामुळे अधिक पैसा कमावण्याच्या लालसेनेच किन्ही राजा सह आजु बाजुच्या गावात दारूचा व्यवसाय गृह उद्योग तर सट्टा पट्टी उदरनिर्वाहाचे साधन झाले आहे. तरूणांनी सट्टा पट्टीला स्वतःच्या उदरनिर्वाहाचे साधन बनविले आहे. घरून पाहिजे तेवढा पॉकेटमनी मिळू शकत नाही, घरून मिळालेल्या पकिटमनी मध्ये तरूणांच्या गरजा भागू शकत नाहीत, यावर तरुणांनी उपाय शोधला असून,सट्टा पट्टीवर पैसा लावून जादा पैसा कमावण्यात तरूण लागले आहेत. सट्टा पट्टीवर तरूणांनी क्रमांकाच्या अंदाजावर आकडेमोड करून सट्ट्याचे गणित मांडल्या जात आहे. तरुणांसोबत, मजुर, महिला वर्ग देखील सट्टयाच्या आहारी जात आहेत. मात्र या नादात पैसा मिळवण्यापेक्षा गमावणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यातुनच कर्जबाजारीपणा आणि नशेच्या आहारी जाणारे तरुण अनपेक्षितपणे गुन्हेगारी कडेही वळत आहे.या सट्टा पट्टीच्या नादी लागुण कित्येक तरुण दिवसभर आकडे मोडीच्या गणिताचा अभ्यास करीत असतात. या अवैध धंद्यांनी कित्येक कुटुंब उद्ध्वस्त केले आहेत. तरीही या धंद्याच्या नादी लागणाऱ्यांची संख्या कमी झालेली नाही. या व्यवसायाबद्दल आरडाओरड झाल्यास काही दिवसांसाठी हे व्यवसाय छुप्या पद्धतीने चालविण्यात येतात. तात्पुरते बंद केल्या जातात त्यानंतर मात्र, परिस्थिती जैसे थे असते. जऊळका पोलिस ठाण्यांच्या हद्दीत किन्ही राजा बिट मध्ये खुलेआम सट्टापट्टीसह, वरली, गावठी दारु व इतर अवैध व्यवसाय सुरू आहेत. मात्र असे असतांनाही जऊळका पोलीस स्टेशन चे ठाणेदार हिवरकर यांची कर्तव्यदक्ष अधिकारी अशी ओळख असतानाही त्यांच्याच कर्मचार्याकडून डोळ्यात धूळ फेक करून ऑल इज वेल... दाखवल्या जात असल्याचे दिसून येत आहे. खुलेआम अवैध व्यवसाय चालु असूनही पोलिसा कडून त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आता कर्तव्यदक्ष ज ऊ ल का पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनीच या गंभीर बाबीकडे लक्ष पुरवावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अवैध धंद्यात खा-की ची ओढ जास्त असल्याने कदाचित खा-की धंवैध धंद्याना जा-की म्हणण्या ऐवजी या-की म्हणत असेल. अवैध धंद्याच्या व्यसनापाई बरबाद झालेल्या कुंटुंबाची हाय नक्की कोणाला लागत असेल याचा विचार खा-णा-यांनी करावा. अन स्वतःच्या फायदयासाठी आपल्या वरिष्ठाना अंधारात ठेवणे कसे अंगलट येऊ शकते हे चौकीचा मागील इतिहासावरून दिसून येईलच.

किन्हीराजा पोलीस चौकीच्या हद्दी मध्ये कुठेही अवैध व्यवसाय चालु नाही. मात्र कुठेही अवैध व्यवसाय चोरट्या मार्गाने चालु असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल,
श्री गणेश हिवरकर
ठाणेदार
पोलीस स्टेशन जऊळका

असंघटित कामगार मजुरांना हक्क व अधिकार याचे प्रबोधन करून लाडू वाटप करून जागतिक कामगार दिवस साजरा

देवळाली कॅम्प, प्रतिनिधी
नाका कामगार तथा असंघटीत क्षेत्रातील कामगारांना कामगार दिनाच्या शुभेच्छापर लाडू चे वाटप केले. कामगार कायदे विषयक प्रबोधन केले...* "अत्याचार विरोधी कृती समिती A.V.K.S.तसेच महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने स्तुत्य ऊपक्रम राबविला... १ मे जागतिक कामगार दिवस तसेच महाराष्ट्र स्थापना दिवसाचे निमित्ताने नाशिकरोड येथील बिटको चौकात नाका कामगार तथा असंघटीत क्षेत्रातील वेठबिगार, असुरक्षित कामगारांना जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र स्थापना दिनाच्या निमित्ताने शुभेच्छापर लाडूचे वाटप करण्यात आले. यावेळी या असुरक्षित नाका कामगार, असंघटीत क्षेत्रातील मजूरांना त्यांचे कायदेशीर हक्क व अधिकारी बाबत प्रबोधन करण्यात आले. विविध सरकारी सेवा सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आली. *अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने ऍड. राहुल विष्णू तुपलोंढे तसेच महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या मार्फत ऍड.निलेश सोनवणे यांनी कायदेशीर बाबींची सखोल माहिती दिली. यावेळी ऊपस्थीत असलेले महिला व पुरूष नाका कामगारांनी त्यांचेवर होणारे अत्याचाराचा व सर्वकष शोषणाचे विदारक सत्य समितीसमोर मांडले. या प्रसंगी समितीचे मुख्य निमंत्रक : ऍड. राहूल विष्णू तूपलोंढे, डॉ. भारत कारीया, ऍड. निलेश सोनवणे, किरण नितनवरे, रोहिणी जाधव (पाली भाषा अभ्यासक, संचालिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडी सेंटर) आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.